● पंढरपूर ● शनिवार, २८ सप्टेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - १३३



दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात आणखी एक. PII



दिवाळीनिमित्त मनसे आणि वीरशैव महिला मंडळ यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम PIII

## कोल्हापूर येथे भाजपच्या बैठकीस परिचारक यांची हजेरी

# तुतारी चर्चेला लागला ब्रेक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी हातात तुतारी घेऊन निवडणूक लढवावी अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली होती. मात्र परिचारक यांनी याबाबत कोणताही निर्णय जाहीर केला नव्हता. परिचारक भाजपच्या काही बैठकीस गैरहजर राहिले असल्याने ते हातात तुतारी घेणार अशी चर्चा होत होती. मात्र कोल्हापूर येथे भाजपच्या . पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकारी यांची बैठक काल झाली. या बैठकीस माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी हजेरी लावली. यामुळे परिचारकांच्या हातात तुतारी घेणार असल्याच्या चर्चेला ब्रेक मिळाला आहे.


आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. यासाठी त्यांनी पांडुरंग परिवाराच्या बैठका पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात घेण्यास सुरुवात केली आहे.

या बैठकीत कार्यकर्त्यांनी सोलापूर जिल्ह्यात तुतारीची हवा असल्याने यंदाच्या निवडणुकीत हातात तुतारी घेऊन निवडणूक लढवावी अशी मागणी केली होती. सोलापूर जिल्ह्यात भाजपचे अनेक नेते मंडळी आली होती. यांची भेट घेण्यास परिचारक गेले नाहीत तर अनेक वेळा सोलापुरात बैठका झाल्या याकडेही परिचारक यांनी पाठ फिरविली. यामुळे परिचारक हे हातात तुतारी घेऊन









निवडणूक लढविणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली होती. परिचारक यांनी मंगळवेढा येथे झालेल्या सभेत विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्यावरही टीका केली होती. यामुळे परिचारक हातात तुतारी घेऊन निवडणूक लढविणार याबाबत सोशल मीडियावरून कार्यकर्ते चर्चा करत होते. मात्र परिचारक आणि कोणतीही भूमिका जाहीर केली नाही. दोन दिवसापूर्वी पंढरपुरात भाजपचे वरिष्ठ नेते मंडळी आली होती. या नेत्यांची भेट घेण्यासाठी माजी आमदार प्रशांत परिचारक युटोपियन कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक व युवा नेते प्रणव परिचारक यापैकी कोणीही गेले नाहीत. यामुळे परिचारक यांचा कौल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे असल्याचे दिसून आले .काही दिवसापूर्वी परिचारक यांचे कार्यकर्ते बार्शी व मुंबई येथे जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांची भेट घेतली होती. यामुळे परिचारक हातात तुतारी घेणार याबाबत चर्चा रंगू लागली होती . आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने दोन दिवसापूर्वी कोल्हापूर येथे पश्चिम महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. ही बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी बैठकीस हजेरी लावली. यामुळे परिचारक भाजपला सोडून हातात तुतारी घेणार या चर्चेला ब्रेक मिळाला आहे. आता परिचारक पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघ की माढा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणार याकडे लक्ष लागले आहे.

## » At a Glance


### उजनी पाटी येथे शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू





**माढा :** पुणे सोलापूर महामार्गावरील उजनी (टें)पाटी येथे महामार्ग ओलांडताना चार चाकी वाहनाने जोरदार धडक दिल्याने कृष्णात सोपानराव पाटील (वय 72 रा. उजनी( टें )तालुका माढा) या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली. कृष्णात पाटील हे महामार्गावर कामानिमित्त आले होते. काम आटोपून ते परत आपल्या दुचाकीवरून महामार्ग ओलांडताना पुण्याहून सोलापूरकडे भरधाव निघालेल्या कारने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातामध्ये त्यांच्या पायास व डोक्यास जबर मार लागल्याने ते गंभीर जखमी झाले.

### कुरनूर धरण 100 टक्के भरले



**अक्कलकोट :** अक्कलकोट तालुक्यातील जनतेसाठी वरदायिनी ठरलेल्या कुरनूर धरणात शंभर टक्के पाणीसाठा झाला आहे. त्यामुळे धरण प्रशासनाकडून धरणाचे तीन दरवाजे उघडण्यात आले आहेत. यातून 210 c4 प्रति सेकंद वेगाने बोरी नदीत विसर्ग सुरू करण्यात आला आहे. धरणातून सोडलेल्या पाण्यावर अक्कलकोट तालुक्यातील आठही बंधारे भरून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न व शेतीचा प्रश्न मिटण्यास मोठी मदत होणार आहे. मागील तीन वर्षात बोरी नदीत पाणी नसल्यामुळे नागरिकांना अनंत अडचणींचा सामना करावा लागला होता.

### मध्यवर्ती नवरात्रोत्सव मंडळ कार्यालयाचे उद्‌घाटन

**सोलापूर :** 3 ऑक्टोबर पासुन सुरु होणाऱ्या शारदीय नवरात्र महोत्सव निमित्त सोलापूर शहरात आदिशक्तीदेवीची प्राणप्रतिष्ठापना तसेच हिंदु धर्म रुढीपंरपरेनुसार विजयादशमी या पवित्र दिनी शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या शमी वृक्षाला सीमोल्लंघनासाठी सार्वजनिक मंडळ कार्यालयाचे उद्‌घाटन करण्यात आले.

## अबब जिल्ह्यातील २ लाख ९२ हजार ग्राहकांकडे विजेची थकबाकी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** विजेचा वापर घरगुती, व्यवसाय व औघोगिकरणासाठी केला जात आहे. मात्र अनेक ग्राहक विज बिल भरण्याकडे दुर्लक्ष करतात. यामुळे विज बिलाची थकबाकी वाढत जात आहे. जिल्ह्यातील २ लाख ९२ हजार ६७० ग्राहकांकडे विज वितरण कंपनीची विजेची ६० कोटी ६३ लाख रूपये थकबाकी आहे. यामुळे विविध कामे करण्यासाठी अडचण येत आहे. ग्राहकांना विज बिल भरण्याची सोय व्हावी म्हणून सुटीच्या दिवशीची भरणा केंद्र सुरू ठेवण्यात आली आहेत.

ग्राहक मोठ्या प्रमाणात विजेचा वापर करतात मात्र बिल भरण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने विज वितरण कंपनीची थकबाकी



मोठ्या प्रमाणावर वाढत आहे.विज बिल वसुलीसाठी कर्मचारी गेल्यास वादाच्या घटना घडत आहेत. यामुळे वसुलीसाठी जाण्यास कर्मचारी घाबरत आहेत. घरगुती, व्यवसायिक, औद्योगिक साठी विजेचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. विज वितरण कंपनीकडून प्रत्येक महिन्याला ग्राहकांना विज बिल दिले जाते. सध्या ऑनलाईन व्यवहार चालत असल्याने विज वितरण कंपनीनी ऑनलाईन बिल भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. अनेक ग्राहकांना विज बिलाचा एसएमएस पाठविला जात आहे.ऑनलाईन बिल अनेक ग्राहक भरत ओहत.काही ग्राहक विज बिल भरणा केंद्रात जावून बिल भरतात.

विज बिल भरणा केंद्रास रविवारी सुट्टी असते. मात्र काही ग्राहकांना रविवारी सुटी असल्याने ते विज बिल भरणा करण्यासाठी येतात मात्र केंद्र बंद असल्याने त्यांची गैरसोय होते. म्हणून विज वितरण कंपनीने सुट्टीच्या दिवशीची विज बिल भरणा केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील २ लाख ९२ हजार ग्राहकांकडे ६० कोटी ६३ लाख रूपयाची थकबाकी असल्याने ती ग्राहकांनी त्वरीत भरावी अन्यथा विज पुरवठा खंडित केला जाईल असा इशारा विज वितरण कंपनीने दिला आहे.



## राजन पाटील यांची सहकार परिषदेच्या अध्यक्षपदी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजन पाटील यांना राज्य शासनाने राज्यमंत्रीपदाचा दर्जा दिला असून त्यांची महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेच्या अध्यक्षतेपदी निवड करण्यात आली आहे. राज्याच्या सहकार विभागाने 27 सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय काढला. 27 सप्टेंबर 2024 पासून पुढील तीन वर्ष किंवा पुढील आदेश येईपर्यंत राजन पाटील यांची या पदावर नियुक्ती राहणार असल्याचे शासन निर्णयामध्ये म्हटले आहे. राज्यामध्ये माहितीचे सरकार आले त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून अजित पवार हे महायुतीच्या सरकारमध्ये सहभागी झाले.

## महिलांचे दागिने चोरणारे दोन आरोपी अटकेत



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर शहर व उपनगरात महिलांच्या गळ्यातील दागिने चोरून नेणाऱ्या दोन चोरट्यांना पंढरपूर शहर पोलिसांनी अटक केली आहे. त्यांनी चार गुन्हे केले असल्याचे कबुली दिली असून त्यांच्याकडून पोलिसांनी बारा लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त केला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी दिली. २८ ऑगस्ट रोजी मैत्रेयी केसकर या एका कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. कार्यक्रम संपल्यानंतर त्या आपल्या घराकडे शाकुंतनगर इसबावी येथे जात असताना पाठीमागून दुचाकी वरून दोन चोरटे आले. त्यांनी मैत्रेयी यांच्या अंगावर तिखट टाकले. यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याचे ४४ ग्रॅम गंठण हिसका मारून पळून नेले. याबाबत केसकर यांनी पंढरपूर शहर » पान ३ वर

## सोलापूरच्या दोन आमदारांकडून विमानतळाची पाहणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** विमानसेवेसाठी सज्ज असलेल्या सोलापूर विमानतळाची पाहणी आज सोलापूरच्या दोन भाजपच्या आमदारांनी केली. यावेळी टर्मिनल मॅनेजर वीरेंद्र ससी यांनी यावेळी आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख यांच्यासह भाजपा पदाधिकाऱ्यांना विमानतळाच्या कामांची माहिती दिली. याप्रसंगी भाजपा सोलापूर शहर सरचिटणीस पांडुरंग दिड्डी, सरचिटणीस रोहिणी तडवळकर, सरचिटणीस विशाल गायकवाड, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, संजय कोळी, प्रसाद कुलकर्णी आणि सोलापूर विमानतळाचे विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

## जिल्ह्यातील दुध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३ कोटी ६९ लाख जमा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** दुध डेअरी चालकांनी गायीच्या दूधाचे दर कमी केले असल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडता होता. शासनाने दुधास अनुदान द्यावे अशी मागणी शेतकरी संघटनाकडून करण्यात आली. याची दखल घेउन शासनाने दुधास प्रति लिटर पाच रूपयाचे अनुदान जाहीर केले. अनुदानाचे वाटप सुरू करण्यात आले असून सोलापूर जिल्ह्यातील ११ हजार ११० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३ कोटी ६९ लाख रूपये जमा करण्यात आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

शेतकरी लाखो रूपये खर्च करून शेतात पिकांची लागवड करतात. मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान होते. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडत आहे. कुटूंब चालविण्यासाठी पैसा हवा म्हणून शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. बाजारात दुधास चांगली मागणी आहे. दर चांगला मिळत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी शेतीस जोड व्यवयास म्हणून दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. मात्र जुलै महिन्यापासून डेअरी चालकांनी गायीच्या दुधाचे दर कमी केले. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला. बाजारात पशुखाद्याचे दर वाढले आहेत. यामुळे दुग्ध व्यवसाय करणे अडचणीचे झाले आहे. म्हणून दुधास शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी शेतकरी संघटनेने केली. याची दखल घेऊन शासनाने १ जुलै २०२४ पासून प्रति लिटर पाच रूपये अनुदान देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी घेतला. यासाठी लागणारा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातील सर्व दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यात ११ हजार ११० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ३ कोटी ६९ लाख रूपये जमा करण्यात आले आहे. सणाच्या आगोदर दुधाचे अनुदान मिळाल्याने शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे.

## शिवसेना ठाकरे गटाची आढावा बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची स्त्री शक्ती संवाद यात्रा पदाधिकारी आढावा बैठक दक्षिण व अक्कलकोट उपनेत्या महिला आघाडी समन्वयक ज्योती ठाकरे, उपनेत्या छाया शिंदे, उपनेत्या अस्मिता गायकवाड, संपर्क संघटिका विधानसभा समन्वयक रोशनी गायकवाड, जिल्हा प्रमुख अमरजी पाटील, माजी नगरसेविका मुंबई निरीक्षक संजना मुणगेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी अक्कलकोट शहर उपशहर पदी किशोरी होटकर, दक्षिण सोलापूर प्रभाग क्रमांक 6 साठी गीतांजली माने यांची नियुक्ती करण्यात आली.

## शताब्दी महोत्सव सोहळा...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**अकलूज :** सातारा येथे, प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि.सातार चा, शताब्दी महोत्सव सोहळा मा. शरद पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.प्रसंगी शताब्दीनिमित्त बँकेने ATM व डिजीटल पेमेंट सेवा सुरू केली यावेळी खा. धैर्यशील मोहिते-पाटील व मान्यवर उपस्थित होते.

### पंढरपूर नगर परिषदेचा अजब कारभार

## पावसाळा संपल्यानंतर केले वृक्षारोपण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण करावे असे अवाहन शासनाकडून करण्यात आले आहे. यामुळे पावसाळा सुरू होण्या आगोदर राज्यात अनेक ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यंदा चांगला पाऊस पडल्याने झाडे चांगल्या प्रकारे आली आहेत. मात्र पंढरपूर नगरपरिषदेने पावसाळा संपल्यानंतर पंढरपूर-गोपाळपूर रस्त्यावर झाडांचे वृक्षारोपण केले आहे. नगरपरिषदेच्या या अजब कामगिरीची चर्चा होवू लागली आहे.

झाडांची संख्या कमी झाली असल्याने पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. याचा परिणाम पावसावर झाला आहे. गेल्या वर्षी राज्यात म्हणावा तसा पाऊस झाला नाही. यामुळे शासनाने पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक,



सामाजिक संघटना, शाळा महाविद्यालये यांना वृक्षारोपण करावे असे अवाहन केले होते. यास चांगला प्रतिसाद मिळाल होता.

प्रत्येक वर्षी जून महिन्यात पावसाळा सुरू होत असल्याने या आगोदर झाडांचे वृक्षारोपण केले जाते. यामुळे नंतर पाऊस आल्यांनतर झाडांची वाढ चांगली होते. यंदा राज्यात चांगला पाऊस पडला आहे. यामुळे वृक्षारोपण केलेली झाडे चांगली आली आहेत.मात्र पंढरपूर नगरपरिषदेने पावसाळा संपल्यानंतर २५ सप्टेंबर रोजी पंढरपूर-गोपाळपूर रस्त्यावर विविध प्रकाच्या झाडांचे वृक्षारोपण केले आहे.हे पाहून नगरिकातून आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.पावसाळा संपल्यानंतर नगर परिषदेने शेकडो झाडांचे वृक्षारोपण करून अजब कारभार केला आहे.या बाबत चर्चा रंगू लागली आहे.

## सार्वजनिक वाचनालय कार्यशाळेचे आज आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातल सर्व शासनमान्य सार्वजनिक वाचनालयांकरीता जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, सोलापूर, सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ सोलापूर व श्री हिराचंद नेमचंद वाचनालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. 28 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11 ते 4 या वेळेत किर्लोस्कर सभागृह, एच. एन. वाचनालय, सोलापूर येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत ई ग्रंथालय आज्ञावली, आर. आर. एल. एफ कोलकत्ता यांचे कडील प्रस्तावांची माहिती, शासकीय, उत्कृष्ट ग्रंथालय इत्यादी विषयांची माहिती दिली जाणार आहे.

## अनिल सावंत यांच्या संकल्पनेतून आयोजित भव्य नोकरी महोत्सव 2024 चे आयोजन

**पंढरपूर :** पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा व परिसरातील सुशिक्षित व होतकरू युवक-युवतींसाठी नोकरी महोत्सव या संकल्पनेतून नोकरीची सुवर्णसंधी मिळवूण देण्यासाठी ५० पेक्षा जास्त कंपन्यांचा सहभाग असलेला भव्य नोकरी मेळावा आयोजित करण्यात आला आहे .

यामध्ये Manufacturing, Banking, Finance, Retail, BPO, KPO, Healthcare, Security, Hospitality, Real Estate, Automobile, Pharma, IT ई. क्षेत्रातील नामवंत कंपन्यामध्ये तरुण- तरुणींना सुवर्णसंधी यामध्ये कमीत कमी शैक्षणिक पात्रता ५ वी पास पासून ते १० वी, १२ वी, पदवीधर, पदव्युत्तर, ITI, डिप्लोमा ई. विविध शिक्षण घेतलेले युवक-युवतीं सहभागी होऊ शकतात.( वय १८ ते ३० पर्यन्त )

सदर मेळावा रविवार दिनांक ०६ ऑक्टोबर २०२४ रोजी पंढरपूर येथील तनपुरे महाराज मठ येथे स.१०.०० ते सायं. ४.०० वाजेपर्यन्त आयोजित करण्यात आला आहे. नाव नोंदणीसाठी या लिंक वरती https://maharashtrajobfair.com/anilsawant/ https://forms.gle/Ld9KSTYFUo9zG2H29 भरावेत. अधिक माहितीसाठी 7350062222 7350142222 या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच नोकरी मेळाव्याला येताना कमीत - कमी पाच किंवा त्यापेक्षा जास्त Resume / बायोडाटा घेऊन येणे आवश्यक आहे असे माहिती आयोजक श्री अनिल दादा सावंत मित्र मंडळ पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघ यांच्यावतीने करण्यात आले आहे. नाव नोंदणी आवशक्य आहे.

**बार्शी :** बार्शी तालुक्यातील खडकोणी येथील 75 वर्षे वृद्ध महिला फिरायला गेली असता पाय घसरून ओढ्यात पडल्याने तीचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवार 26 रोजी सकाळी 6 वाजून 30 मिनिटांनी उघडकीस आली. गंगुबाई वसंत कोतमिरे (वय 75, रा. खडकोणी, ता. बार्शी ) असे मृत वृद्ध महिलेचे नाव आहे. याबाबत मृताचा मुलगा भास्कर वसंत कोतमिरे (वय 46, रा. खडकोणी ) यांनी फिर्याद दिली आहे.

### अल्ताफ दादासाहेब शेख दिग्दर्शित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला मिळाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार

# दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाला आंतरराष्ट्रीय दर्जाचा पुरस्कार मिळाला आहे. वेडा BF, बेतुका, कम ऑन विष्णू, ब्रेक डाऊन धारावी कट्टा असे एकाहून एक सरस व ज्या चित्रपटांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर कौतुक झाली चित्रपटाचे दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाची इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मध्ये निवड झाली आहे. यासाठी साऊथ आफ्रिका येथे कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे स्क्रीनिंग झाले. यावेळी या चित्रपटाचे अनेक कौतुक करत अल्ताफ शेख यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वाणिज्य दुत, पनामा, हेड ऑफ रीजन मेरीटाईम ऑथरिटी जिजस कँपोस, डॉ.अमजदखान, नाशिकच्या विभागीय आयुक्त संगीता धायगुडे यांच्या हस्ते अल्ताफ शेख यांना सन्मानित करण्यात आले.

सोलापूर जिल्ह्यातील सांगोला मतदारसंघाचे तब्बल अकरावेळा आमदार आणि दोन वेळा कॅबिनेट मंत्री झालेले आबासाहेब ऊर्फ स्व. गणपतराव देशमुख यांच्या जीवन चरित्रावर कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट तयार करण्यात आला आहे. या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी केले आहे. मायाक्का माऊली फिल्म प्रोडक्शन आणि मुंबई किएशन एंटरटेनमेंट निर्मित कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटाचे बाळासाहेब एरंडे व मारुती बनकर हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. 25 ऑक्टोबर 2024 ला संपूर्ण जगभर हिंदी आणि मराठी भाषेत रिलीज होत आहे

दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी वेडा BF, बेतुका, कम ऑन विष्णू, ब्रेक डाऊन धारावी कट्टा, असे एकाहून एक सरस चित्रपटांचे लेखक, दिग्दर्शन केले आहे. कर्मयोगी आबासाहेब या चित्रपटात या चित्रपटात प्रमुख भूमिका अभिनेता अनिकेत विश्वासराव साकारत असून हर्षद जोशी, विजय पाटकर, अभिनेत्री देविका दप्तरदार, निकिता सुखदेव, सैराट' फेम अरबाज शेख, तानाजी गुलगुंडे, अहमद देशमुख, सुरेश विश्वकर्मा, प्रदीप वेलणकर, अनिल नगरकर, प्रतीक प्रताप (छोटा पुढारी) घनश्याम दरोडे वृंदा बाळ आदि कलाकारांच्या महत्वपूर्ण भूमिका आहेत.

प्रसिद्ध संगीतकार अवधूत गुप्ते यांनी संगीत दिले आहे, तर चित्रपटातील गाणी बॉलीवूड सिंगर कुणाल गांजावाला आणि मनीष रांजणे यांनी गायली आहेत. छाया चित्रकार कुमार डोंगरे, स्टील फोटोग्राफर राजेंद्र कोरे, वेशभूषा संगीता चौरे व पोर्णिमा मराठे, एक्झिक्युटिव्ह प्रोड्यूसर अमजदखान शेख, प्रोडक्शन कंट्रोल (सफर) उर्फ सय्यद दादासो शेख पोस्ट प्रोडक्शन मॅनेजिंग अविनाश जाधव विशेष सहकार्य उल्हास धायगुडे पाटील यांचे आहे.

## बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू





■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** बार्शी-कुर्डुवाडी रोडवरून बार्शीकडे येणाऱ्या दुचाकीस बसने समोरासमोर जबर धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना बुधवार, दि. २५ रोजी रात्री ८च्या सुमारास घडली. ज्ञानेश्वर अरुण जाधवर (२६ रा. धोत्रे, ता. बार्शी) मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी मयताचा भाऊ प्रवीण जाधवर (३०, रा. दत्तनगर, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून बसचालक संतोष सुधाकर पोतदार (रा. उमरगा, जि. धाराशिव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबतचा अधिक तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

» Selected

## शिधा न मिळाल्याने रेशनकार्ड धारकांचा संताप




**सोलापूर :** गौरी-गणपती सणाच्या निमित्ताने शासनाने रेशनकार्डधारकांना आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय घेतला होता, परंतु दोन्ही सण संपल्यानंतरही अनेक नागरिकांना शिधा मिळालेला नाही. उत्तर, दक्षिण सोलापूर, माळशिरस, अक्कलकोट व पंढरपूर या पाच तालुक्यांसाठी आनंदाचा शिधा प्राप्त झाला आहे, मात्र उर्वरित सहा तालुक्यांसह सोलापूर शहरातील सर्व लाभार्थी अजूनही वंचित आहेत. यावरून भाजपचे आमदार आरोप करत आहेत की, त्यांच्या तालुक्यातील रेशनकार्डधारकांना विशेष प्राथमिकता दिली जात आहे.

## सोलापूर विमानसेवेसाठी डिसेंबरपर्यंत करावी लागणार प्रतीक्षा



**सोलापूर :** पुण्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्टी प्रणालीद्वारे सोलापूर विमानसेवेचा होणारा औपचारिक शुभारंभ दौरा रद्द झाल्यामुळे लांबणीवर पडला आहे. हा औपचारिक शुभारंभ लांबणीवर पडला तरी प्रत्यक्षात सोलापूरची विमानसेवा सुरू होण्यास आणखी दोन ते अडीच महिन्यांपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे. बहुप्रतीक्षित आणि बहुचर्चित विधानसभेचा औपचारिक शुभारंभ आगामी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी घाईगडबडीत पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्याचा मुहूर्त साधण्यात आला होता.

## बेकायदेशीर बांधकाम; अडीच कोटी अपहाराचा संशय




**सोलापूर :** महापालिकेतील ९६ बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणात २ कोटी ४२ लाख रुपयांच्या रकमेचा अपहार झाल्याचा प्रशासनाचा संशय आहे. त्यामुळे या विषयाचा तपास करावा, असा पुरवणी जबाब पालिकेने सदर बझार पोलिसांकडे सादर केला. दरम्यान, या प्रकरणातील चार संशयित अधिकाऱ्यांच्या जामिनावरील सुनावणी गुरुवारी झाली नाही. ही सुनावणी चार ऑक्टोबर रोजी होणार आहे. बेकायदेशीर बांधकाम परवाने दिल्याप्रकरणी झाकीरहुसेन नायकवाडी, श्रीकांत खानापुरे, शिवशंकर घाटे, आनंद क्षीरसागर यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## बंजारा समाजातील आणखी एक नेता दक्षिणच्या मैदानात



**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात सर्वच पक्षांकडून इच्छुकांची संख्या वाढली आहे. त्यामध्ये आता आणखी एका नेत्याची भर पडली असून बंजारा समाजातील अशोक चव्हाण हे मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. चव्हाण यांच्या पाठीशी राष्ट्रीय बंजारा परिषदेची ताकद असल्याचे समोर आले आहेत. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेल्या यशानंतर काँग्रेस पक्षाकडून अनेक नेत्यांनी उमेदवारी मागितली आहे. त्यानंतर भाजप कडून ही इच्छुकांची संख्या वाढली. आता अपक्ष लढण्याची तयारी अनेक जण करीत आहेत.

## वसुंधरा संमेलनानिमित्त सोलापुरात निघाली वृक्षदिंडी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर महानगरपालिका पर्यावरण विभागाच्यावतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत महाराष्ट्र राज्यात प्रथमच सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने पहिल्या वसुंधरा संमेलनाच्या निमित्ताने आज गुरुवारी वृक्ष दिंडी काढण्यात आली. यात हजारो विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. महापालिका परिसरात रोपवाटिकांचे प्रदर्शनही भरवण्यात आले. चार हुतात्मा पुतळा परिसरात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव उमेश देवर्षी यांच्या हस्ते वृक्षदिंडीचे उद्घाटन झाले. विद्यार्थ्यांनी झाडे वाचवा, झाडे जगवा यासह पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा दिल्या.

## सत्कार...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**कुर्डूवाडी :** कुर्डूवाडी नगरपरिषद चे नूतन मुख्याधिकारी श्री. प्रशांत भोसले यांचा कुर्डूवाडी व्यासपीठ तर्फे सहर्ष स्वागत व सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कुर्डूवाडी व्यासपीठ कार्याध्यक्ष. अध्यक्ष. उपाध्यक्ष. सचिव. सहसचिव सर्व सदस्य उपस्थित होते.

## पोलीस आयुक्तालयात शांतता कमिटीची बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर यांच्या वतीने आज नवरात्र व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, विजय कबाडे, डॉ. दिपाली काळे, सर्व सहा. पोलीस आयुक्त, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, इतर खात्यातील अधिकारी व मंडळाचे पदाधिकारी, उपस्थित होते.

## आ. देशमुख यांच्या कार्यकर्त्याला ही गोष्ट लागली



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विशेष करून हद्दवाढ भागात दक्षिण मधील इच्छुक उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी केली. वैद्य यांना हद्दवाढ भागातील भाजपच्या पाच ते सहा माजी नगरसेवकांनी शिफारस देत उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. यावरून भारतीय जनता पार्टीमध्ये चांगलेच राजकारण पेटले आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यकर्त्यांना मात्र हे सहन झाले नाही त्यांना चांगलेच झोंबले असल्याचे दिसत आहे.

## तहसीलदार यांनी केली पीक नुकसानीची पाहणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बार्शी :** तालुक्यातील गौडगाव व उपळे दुमाला मंडळात गेल्या ६ ते ७ दिवसापासून पडत असलेल्या मुसळधार व सततच्या पावसाने सोयाबीन पिकाचे हजारो हेक्टर सोयाबीन पाण्याखाली गेले आहे. या पिकाची पाहणी करण्यासाठी तहसीलदार एफ. आर. शेख व तालुका कृषी अधिकारी संतोष कोयले यांनी गौडगाव व उपळे दुमाला मंडळातील पिकाची पाहणी केली. अनेक शेतकऱ्यांचे काढणीला आलेले सोयाबीन पीक पाण्यात गेले आहे. तर काढून टाकलेल्या ढिगाऱ्याखाली पाणी साचले आहे. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांना मोठा फटका सहन करावा लागला आहे.







### पंढरपूर एज्युकेशन सेवक सह.पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

# सभासदांना ७ टक्के लाभांश जाहीर-चेअरमन राजेश धोकटे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** येथील कवठेकर प्रशाला, द. ह. कवठेकर प्रशाला अध्यापक विद्यालयातील पंढरपूर एज्युकेशन सेवक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन राजेश धोकटे हे होते. यावेळी सभासदांना 7 टक्के लाभांश जाहीर करण्यात आला.

तसेच सभासदांच्या इ. 10 वी 12 वी तील उत्तीर्ण झालेल्या मुला-मुलींना फेटा बांधून 1 हजार रुपयांचे पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. माजी संचालक व द.ह.कवठेकर प्रशालेतील सेवानिवृत्त शिक्षक गजेंद्र पवार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. गेल्या महिन्यात बिनविरोध निवडून आलेल्या सर्व नूतन संचालकांचा सत्कार करण्यात आला. अहवाल वाचन सुधीर मागाडे यांनी केले. सभासद बडवे, नरेंद्र भंडारकवठेकर यांनी संस्थेच्या कामकाजाविषयी समाधान व्यक्त केले.

यावेळी व्हा. चेअरमन प्राचार्य एच. आर. वाघमारे, सचिव सुधीर मागाडे, संचालक व्ही. एम. कुलकर्णी, प्रशांत मोरे, दत्तात्रय पाटोळे, गावडे,अमित वाडेकर, तानाजी लिंगडे, स्वप्रजा मोहिते, श्रीमती ज्योती उत्पात यांच्यासह सभासद बंधू-भगिनी उपस्थित होते. सर्वसाधारण कर्जाची मर्यादा 14 लाख रुपये तर तातडीच्या कर्जाची मर्यादा 2 लाख रुपये ठेवण्यात आली. व्याजदर 8 टक्के इतका ठरवण्यात आला. तसेच सभासदांना 7 टक्के लाभांश मंजूर करण्यात आला.

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विशेष करून हद्दवाढ भागात दक्षिण मधील इच्छुक उमेदवार सोमनाथ वैद्य यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी केली. वैद्य यांना हद्दवाढ भागातील भाजपच्या पाच ते सहा माजी नगरसेवकांनी शिफारस देत उमेदवारी देण्याची मागणी केली आहे. यावरून भारतीय जनता पार्टीमध्ये चांगलेच राजकारण पेटले आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या कार्यकर्त्यांना मात्र हे सहन झाले नाही त्यांना चांगलेच झोंबले असल्याचे दिसत आहे.

# पंढरीत दिवाळीची खरेदी एकाच छताखाली

## दिवाळीनिमित्त मनसे आणि वीरशैव महिला मंडळ यांचा नाविन्यपूर्ण उपक्रम

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळ पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिला उद्योजकांसाठी पंढरपूर मध्ये भव्य असा एक्सपो घेऊन दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम येथील टिळक स्मारक मैदानावर दिनांक १९,२० ऑक्टोबर २०२४ रोजी भरवण्यात आला आहे. यामध्ये भाग घेणाऱ्या महिला उद्योजकांसाठी मोफत स्टॉल व स्टॉल उभारण्यासाठी विना व्याज कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी स्टॉलची बुकिंग करावी असे आवाहन मनसे नेते दिलीपबापू धोत्रे आणि डॉक्टर शोभा कराळे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले आहे. यावेळी मनसेचे पदाधिकारी व आद्य वीरशैव महिला मंडळाचे अध्यक्ष डॉ. सौ.शोभा कराळे, सौ.सुवर्णा स्वामी, सौ.आरती पावले, सौ.कविता पावले, सौ. विशालाक्षी पावले, सौ.संजीवनी ठीगळे, सौ.मनीषा वासकर, सौ.अनुराधा स्वामी उपस्थित होत्या. पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा. नागरिकांना दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता यावी. या हेतूने महाराष्ट्र नवनिर्माण सेना व आद्य वीरशैव महिला मंडळाच्या वतीने पंढरपुरात प्रथमच दिवाळीची खरेदी एकाच छताखाली करता येणार आहे. या एक्सपो मध्ये २०० स्टॉल उभारण्यात येणार असून यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाम मात्र नोंदणी फी १०१ ठेवण्यात आली आहे. भाग घेणाऱ्या महिला भगिनींना मोफत सुसज्ज स्टॉल दिले जाणार आहेत. तसेच महिलांना २५ हजार रुपये स्टॉल उभारण्यासाठी कर्ज स्वरूपात देण्यात येणार आहे. हे कर्ज एक्सपो संपल्यानंतर भरावे लागणार आहेत. याला कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. यामध्ये भाग घेणाऱ्या महिलांना नाव नोंदणी ५ ऑक्टोबर पर्यंत करता येणार आहे. प्रथम येणाऱ्या महिलांना यामध्ये संधी दिली जाणार आहे. दिवाळीनिमित्त नाविन्यपूर्ण उपक्रम मनसेच्या वतीने येथील टिळक स्मारक मैदानावर घेण्यात आला आहे. तरी पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील महिलांनी भाग घ्यावा असे आवाहन मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी केले आहे. यावेळी शहराध्यक्ष संतोष कवडे, शहर संघटक गणेश पिंपळनेरकर, मार्गदर्शक संदीप रणवरे, महेश पवार, ओंकार जाधव, शशिकांत पाटील, समाजसेवक बाबा चव्हाण इत्यादी उपस्थित होते.

### दक्षिणसाठी चव्हाण यांनी केली भाजपकडे उमेदवारीची मागणी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार सुभाष देशमुख यांना आणखी एक धक्का बसला असून त्यांचे कट्टर समर्थक सचिन चव्हाण यांनी भारतीय जनता पार्टीकडे दक्षिणमधून उमेदवारीची मागणी केली आहे. राज्यामध्ये बंजारा समाज अतिशय आक्रमक असून यावेळी काही करून समाजाचे जास्तीत जास्त आमदार विधानसभेत पाठवण्याचा निर्धार करण्यात आला आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात तांड्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असून सुमारे 40 हजारापेक्षा अधिक मतदार आहेत.

» पान १ वरुन

## महिलांचे दागिने चोरणारे दोन आरोपी...

पोलीस ठाण्यात येऊन अज्ञात दोन चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. यानंतर पोलिसांनी चोरट्यांचा तपास सुरू केला. पोलीस टाकळी रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना दुचाकीवरून दोन तरुण जाताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला. मात्र त्यांनी वेगाने दुचाकी चालवून पळून जाण्याचा प्रयत्न केला. यामुळे पोलिसांचा संशय बळावला. पोलिसांनी पाठलाग करून दोघांना पकडले. त्यांना पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात आणून कसून चौकशी केली असता त्यांनी आपली नावे विनोद पिंगळे (रा.उजनी कॉलनी श्रीपुर) व महादेव पवार ( रा. श्रीपुर तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर) असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांच्याकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी 28 ऑगस्ट रोजी इसबावी येथे एका महिलेच्या गळ्यातील दागिने हिसकावून नेले असल्याची कबुली दिली. त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी आणखी तीन गुन्हे केले असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी त्यांच्याकडून बारा लाख रुपये किमतीचे 18 तोळे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. या प्रकरणाचा तपास जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष कांबळे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश गोसावी, नागनाथ कदम, शरद कदम, शर्मा, गोडसे, सचिन हेंबाडे, नवनाथ माने यांनी केला.

**नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्त ठेवण्याची मागणी**

नवरात्र सणानिमित्त महिला पंढरपूर शहरातील विविध मंदिरात देवीच्या दर्शनासाठी जातात यावेळी मंदिरात गर्दी असते याचा फायदा घेऊन चोरटे महिलांच्या गळ्यातील दागिने लंपास करतात म्हणून पोलिसांनी नवरात्राच्या पार्श्वभूमीवर मंदिरे व रस्त्यावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवावा अशी मागणी महिला वर्गातून होत आहे.

**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये )

जा. क्रं.4237 दि. 28/09/2024

रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ३५९५/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-दिनेश कुमार दहिहंडे** रा.१२२२,गवंडीगल्ली,कवठेकर प्रशाला,पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती - विश्वजित विजय व्यवहारे** रा. ३४२,झेंडेगल्ली,पंढरपूर,ता.पंढरपूर,जि.सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती -प्रमोद हरिष आदलिंगे** |
| ३६८६/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-पल्लवी दत्ता कोरे** रा.१२२२,भाजी मार्केट गांधी रोड, पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती-राधिका सिद्धनाथ माने** रा.घर नं.३०४१,कैकाडी महाराज मठाजवळ,पंढरपूर ता.पंढरपूर, जि.सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती -पल्लवी उमेश राऊत** रा. १२९७,लोणार गल्ली,पंढरपूर, ता.पंढरपूर,जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ५/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

## आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत उमा महाविद्यालयाचे यश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत बी.एम.आय.टी कॉलेज बेलाटी, सोलापूर येथे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत उमा महाविद्यालयाच्या मुलींमध्ये कु. वृंदाक्षी पांडुरंग बुरांडे या विद्यार्थिनीने दूसरा क्रमांक मिळवत सोलापूर विद्यापीठाच्या संघात स्थान मिळवले तसेच कु. पूजा महावीर माणगावे हिने सुद्धा उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. सर्व विजेत्या खेळाडूंचे संथेचे अध्यक्ष मा. आ. प्रशांत परिचारक, उपाध्यक्ष मा. श्री. मुकुंद परिचारक, खजिनदार मा. श्री. रमेश लाड, सचिव मा. श्री. राजगोपाल भट्टड, विश्वस्त मा. श्री. प्रणव परिचारक व इतर संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे कार्यवाहक मा. प्राचार्य डॉ. मिलिंद परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड यांनी खेळाडूंचा सत्कार करून अभिनंदन केले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. धिरजकुमार बाड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद ढवण, व जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शन लाभले. सत्कार कार्यक्रमाप्रसंगी सर्व प्राध्यापक, कार्यालयीन अधीक्षक श्री. एस. डी. पारखे, सर्व प्रशासकीय सेवक, महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.

### यंदाच्या रब्बी हंगामात हे पीक ठरेल 'मालदार'

**बार्शी :** लवकरच रब्बीचे हंगाम येणार आहे. यात कोणते पीक घेतले पाहिजे असा प्रश्न शेतकऱ्यांना नक्कीच पडत असेल. तर मागील काही दिवसांपासून हरभऱ्याच्या भावातील तेजी कायम आहे. देशातील अनेक बाजारात हरभऱ्याचा भाव वाढला आहे.

## आश्वासन....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत बी.एम.आय.टी कॉलेज बेलाटी, सोलापूर येथे आयोजित केलेल्या आंतर महाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत उमा महाविद्यालयाच्या मुलींमध्ये कु. वृंदाक्षी पांडुरंग बुरांडे या विद्यार्थिनीने दूसरा क्रमांक मिळवत सोलापूर विद्यापीठाच्या संघात स्थान मिळवले तसेच पूजा मानगावे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या विजयी खेळाडूंचा सत्कार महाविद्यालयाचे वतीने करण्यात आला. याप्रसंगी विजेत्या खेळाडू समवेत महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग.

**सोलापूर :** राज्यातील ज्या कापुस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन 2023 च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप/ पोर्टलद्वारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे अशा नोंदणीकृत शेतकऱ्यांना 0. 20 हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रुपये 1 हजार तर 0. 20 हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर 5 हजार रुपये (2 हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

## कर्मयोगी इंस्टिट्यूटच्या सहा विद्यार्थ्यांची निवड




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** श्री पांडुरंग प्रतिष्ठान संचलित कर्मयोगी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (अभियांत्रिकी) महाविद्यालयातील सहा विद्यार्थ्यांची पुणे येथील आयटी प्रेन्युअर या नामांकित प्रशिक्षण देणाऱ्या कंपनी मध्ये निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील यांनी दिली.

या कंपनीने घेतलेल्या मुलाखाती मधून कम्प्युटर सायन्स अँड इंजिनियरिंग विभागातील अंतिम वर्षामध्ये शिकत असणाऱ्या वृशाली बाबर, संजीवनी बाबळसुरे, विशाल चव्हाण, मनीषा म्हेत्रे, प्रज्ञा कळकुंबे व श्रुती ठाकरे या विद्यार्थ्यांची निवड केली आहे. आयटी प्रेन्युअर ही पुण्यामधील सर्वोत्कृष्ट आयटी प्रशिक्षण संस्थांपैकी एक आहे जी आयटी क्षेत्रात नवीन कौशल्ये आणि प्रतिभांचा परिचय करून देण्यासाठी समर्पित आहे. आयटी क्षेत्रातील नोकरीच्या संधी आणि त्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये यांच्या विकासाच्या सर्व स्तरांवर अद्वितीय प्रशिक्षण देणारी व विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणारी संस्था आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत दिले जाणारे प्रशिक्षण हे कार्पोरेट क्षेत्रात नोकरी लागण्यासाठी अतिशय पूरक व उपयोगी होत आहे असे निवड झालेल्या विद्यार्थी आवर्जून संगितले.

श्री पांडुरंग प्रतिष्ठान चे विश्वस्त श्री. रोहन परिचारक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस पी पाटील, कर्मयोगी पॉलिटेक्निक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.बी.कणसे, रजीस्ट्रार श्री. जी डी वाळके, उप प्राचार्य प्रा. जे एल मुडेगावकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. मोहसीन शेख, संशोधन अधिष्ठाता डॉ. अभय उत्पात, शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. आशीष जोशी, विभागप्रमुख प्रा. अनिल बाबर, डॉ. एस व्ही एकलारकर, प्रा. दीपक भोसले, प्रा. एस एम लंबे, प्रा. अभिनंदन देशमाने तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंटचे समन्वयक प्रा. सुशील कुलकर्णी, प्रा. व्ही एल जगताप, प्रा. दत्तात्रय चौगुले, प्रा. योगेश माने व इतर सर्व प्राध्यापक यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### उमा महाविद्यालयात

## सायबर-सुरक्षा या विषयावरती एक दिवशीय कार्यशाळा संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**पंढरपूर :** उमा महाविद्यालयाच्या IQAC, रोजगार व समुपदेशन विभाग आणि व MKCL यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 27/09/2024 रोजी सायबर सुरक्षा जागरूकता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्रमानव बुद्धिमत्ता या विषयावरती एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.धीरजकुमार बाड सर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. श्री शेखर आडगळे MKCL मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह सोलापूर विभाग हे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्रमानव बुद्धिमत्ता याबद्दल प्रात्यक्षिकासह सखोल असे मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी मोबाईलचा वापर करताना योग्य ती काळजी घेऊन होणाऱ्या धोक्यापासून सुरक्षित कसे राहायचे याबद्दल ही विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण केली.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड सर यांनी मोबाईलचा व ऑनलाईन बँकिंगचा वापर करत असताना योग्य ती खबरदारी घ्यावी याबद्दल त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आय आय टी कॉम्प्युटर सेंटरचे संचालक मा. नितीन आसबे सर यांनी एम.के.सी.एल च्या माध्यमातून शासनाने मोफत सुरू केलेल्या विविध कोर्सेसची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. भगरे एस. व्ही. यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. चौगुले ए. यु. यांनी केला . सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका सौ. हजारे एस.डी. यांनी केले व तसेच आभार प्रा. राष्ट्रपाल गाडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.






**लवाद अधिकारी ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
( मल्टिस्टेट को.ऑप. सोसायटीज ॲक्ट २००२ आणि आर्बिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये )

जा. क्रं.4218 दि. 28/09/2024

रेणुका भवन,
रेणुका भवन, २ मजला सर्वे नं. ३५/२३अ*२ब पुष्पक हॉटेलजवळ
पाईपलाईन रोड सावेडी अ.नगर
अहमदनगर-४१४ ००१

**जाहीर नोटीस**

श्री. रेणुकामाता मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. अहमदनगर -अर्जदार
विरुद्ध

| लवाद अर्ज क्रमांक | सामनेवाला क्रमांक | सामनेवाला यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|
| ३६२४/२०२४ | | **कर्जदार श्री/श्रीमती-मुढे आनंद शिवाजी** रा.जावळे गल्ली, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती - इंगळे शेखर गणेश** रा. मुढे गल्ली, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर<br>**जामीनदार श्री/श्रीमती -घाटुळ रेखा नितीन** रा. मुरडे गल्ली, ता. मंगळवेढा, जि.सोलापूर |

सदर नोटीसव्दारे तुम्ही वरील सर्व सामनेवाले यांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमचेविरुद्ध वर नमूद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहे. सदर लवाद अर्ज चौकशीच्या कामी आपण दिनांक ५/१०/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वा. लवाद कार्यालयात न चुकता हजर रहावे. तुम्ही जर हजर न राहिल्यास तुमच्या विरुद्ध लवाद अर्जाचा एक्स पार्टी/एकतर्फी हुकूम करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर नोटीस माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

**सही/-**
**ॲड. तनपुरे गोविंद दशरथ**
**लवाद अधिकारी**

**महाराष्ट्र शासन**
**सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पंढरपूर यांचे कार्यालय**
दूरध्वनी क्रमांक-०२१८६२२३८३३ ई मेल आयडी tmvpppur@gmail.com

जा.क्र.तालपसचि/पं/तां/लिलाव/२३६/२०२४
पंढरपूर, दिनांक २५/०९/२०२४

**लिलाव नोटीस**

मा. सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन ता.ल.प.स.चि.पंढरपूर,जि.सोलापूर यांचे कार्यालयातील खालील तपशीलप्रमाणे निरुपयोगी/दुरुस्त न होण्याजोग्या व कालबाह्य झालेल्या तसेच निर्लेखीत केलेल्या वस्तुंचा लिलाव करणेचा आहे. सदरचा लिलाव दिनांक ०४/१०/२०२४ रोजी दुपारी ठिक १५.०० ते १७.०० या वेळेत सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तालपसचि,पंढरपूर कार्यालयातील आयोजित केला आहे. तरी इच्छुकांनी लिलावाकरिता वेळेत उपस्थित रहावे. लिलावातील वस्तु लिलावाच्या वेळेपुर्वी एक तास अगोदर पाहवयास मिळतील.

**वस्तुंचा तपशील**

| अ. क्र. | वस्तु/साहित्याचे नांव | नग संख्या | वस्तुची खरेदी किंमत | खरेदी दिनांक | आयुष्यमान संपल्याचा दिनांक | घसारा किंमत रुपये | हातची किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ब्लड अनालयझर हिमॅटोलोजिकल Mubdray Model NO.BC२८०० Vet RR-१४१०१६३० | १ | ३,१८,०००/- | २०/०५/२०११ | २०/०५/२०२१ | २,८६,२००/- | ३१,८००/- |
| २ | बायोकेमिकल ऍनालायझर Acculab-२०१ Sr.No.T१००२१५४ | १ | १,९०,०००/- | ३०/०३/२०१० | ३०/०३/२०२० | १,७१,०००/- | १९,०००/- |

**लिलावाच्या अटी व शर्ती-** १. सदरचा लिलाव जेथे आहे तेथे व जसे आहे तसे या अटीवर करण्यात येईल. २. सर्वात जास्त बोली लावणाऱ्या इसमास लिलावातील वस्तु मिळतील. ३. लिलाव मान्य झाल्यावर योग्य ती रक्कम भरुन लिलावातील साहित्य अर्धा तासाच्या आत घेऊन जाण्याचे आहे. ४. लिलावात भाग घेण्यासाठी रुपये १००/-इतकी अनामत रक्कम भरावी लागेल. लिलाव संपलेनंतर लगेचच ती रक्कम संबंधीतास परत करण्यात येईल. ५.लिलाव साहित्याची विल्हेवाट लावण्याची सर्व जबाबदारी लिलाव घेणाऱ्या व्यक्तीची राहील. सदर विल्हेवाटीच्या कोणत्याही कायदेशीर व प्रदूषण संबंधीत बाबींसाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. ६. लिलाव समितीचा निर्णय अंतिम राहिल तसेच लिलाव प्रक्रिया कोणत्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार लिलाव समितीस असतील.

सही/-
(डॉ.राजेंद्रनाथ सोमनाथ सावळकर)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
तालुका लघुपशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय,पंढरपूर

## मृत्यूदंडाचे वास्तव

फाशीची शिक्षा ही गंभीर गुन्ह्यात दिली जाते. बलात्कार, अत्याचार, हत्या, देशविघातक कारवाया यासारख्या गंभीर गुन्ह्यात दोषींना मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली जाते. पुण्यातील गाजलेला जोशी अभ्यंकर हत्याकांड असो, पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या आणि मुंबईवरील दहशतवादी हल्ला या प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा देण्यात आली. गेल्या काही वर्षांत गुन्ह्याची व्याप्ती वाढल्याने शिक्षेचे स्वरुपही अधिक कडक केले जात आहे, जेणेकरून आरोपींवर वचक बसेल. मात्र मृत्युदंडाची शिक्षा असलेल्या गुन्हेगारांची संख्या वाढत असताना तुलनेने अंमलबजावणीचे प्रमाण कमीच राहत आहे. या स्थितीवर कायदेपंडितांत चर्चा सुरू आहे. एका अहवालात २०२३ मध्ये मृत्युदंडाची शिक्षा असणाऱ्या कैद्यांची संख्या ५६१ वर पोचल्याचे म्हटले आहे. हा गेल्या १९ वर्षांतील उच्चांक आहे. तत्पूर्वी 'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार, २००४ मध्ये मृत्यूदंडाची शिक्षा असलेल्या कैद्यांची सर्वाधिक ५६३ संख्या नोंदली गेली. अलिकडच्या काळात अशा प्रकारच्या शिक्षा असलेल्या कैद्यांच्या संख्येत वाढ होण्यामागची अनेक कारणे आहेत. याचिकावरील सुनावणींचा कमी दर आणि मृत्युदंडाची शिक्षा देण्याचे वाढते प्रमाण आदी. पण दिल्लीच्या राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या प्रोजेक्ट ३९-अ नुसार दरवर्षी मृत्यूदंड शिक्षेबाबत वार्षिक अहवाल जारी केला जातो. यात म्हटले, २०२३ मध्ये मृत्युदंडाची शिक्षा देणारे १२० आदेश बजावण्यात आले. २०१६ मध्ये १५६ आदेश काढले होते. २०१९ नंतर प्रथमच लैंगिक शोषणासंबंधीच्या कलमानुसार सत्र न्यायालयाने सर्वाधिक मृत्युदंडाची शिक्षा २०२३ मध्ये सुनावली. या वर्षात गैरवर्तन आणि हत्येसह लैंगिक गुन्ह्यांसाठी सुमारे ६४ जणांना (सुमारे ५३ टक्के) मृत्युदंडाची शिक्षा सुनावली. ही संख्या २०१६ मध्ये बजावलेल्या संख्येपेक्षा अधिक होती. २०१६ मध्ये २७ कैद्यांना शिक्षा ठोठावली होती. ७५ टक्के प्रकरणे ही अल्पवयीन मुलांच्या लैगिंक शोषण अणि अत्याचाराशी संबंधित असल्याने न्यायालयाकडून सुनावण्यात येणाऱ्या मृत्युदंडाच्या शिक्षेचे प्रमाण अधिक राहिले. २०२० नंतर प्रथमच गेल्यावर्षी उच्च न्याायलयात मृत्युदंडाच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करण्याचे सर्वात कमी प्रमाण राहिले. विशेष म्हणजे सत्र न्यायालयाकडून मृत्युदंडाची शिक्षा निश्चित करण्याचे प्रमाण २००० नंतर २०२३ मध्ये सर्वात कमी राहिले. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयात तपासाची प्रक्रिया प्रभावी नसल्याचा उल्लेख करत लोकांना दोषी ठरवून मृत्युदंडाची शिक्षा देणाऱ्या न्यायालयातील साक्षीदाराच्या विश्वसनीयतेवर अहवालात गंभीरपणे चिंता व्यक्त केली. अहवालात म्हटले, मृत्युदंडाबाबतचे आकडे पाहिले तर न्यायालयीन यंत्रणेचा प्रभाव अणि विश्वसनीयता यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. भारतात मृत्युदंडाच्या घटनात्मक स्थितीवर विचार करणे गरजेचे आहे. भारतीय घटनेच्या कलम ७२ आणि कलम १६१ मध्ये अनुक्रमे राष्ट्रपती अणि राज्यपालांना मृत्युदंडाची शिक्षा माफ करण्याचा अधिकार दिला. कारण राष्ट्रपती जनतेचे सर्वोच्च निर्वाचित प्रतिनिधी मानले जातात. याप्रमाणे सार्वभौम शक्तीच्या पदावर असलेल्या व्यक्तीकडून या अधिकाराचा वापर केला जावू शकतो. दुसरीकडे हरियाना विरुद्ध राजकुमार २०२१ च्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्याअगोदरच राज्यपाल आरोपीची मृत्युदंडाची शिक्षा माफ करू शकत नाही, असे सरकारकडून सांगण्यात आले होते. मात्र यावर सर्वो न्यायालयाने म्हटले, राज्यपाल हे राष्ट्रपतीचे प्रतिनधी असण्याबरोबरच घटनात्मक प्रमुख आहेत. त्यामुळे दोन्ही शक्तीमध्ये कोणताही फरक करता येणार नाही. भारतीय घटनेच्या कलम ३०२ मध्ये मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. सध्या नव्या भारतीय न्याय संहितेत देखील अनेक गुन्ह्याप्रकरणी मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतूद केली आहे. जसे हत्या, बारापेक्षा कमी वयोगटातील मुलींचे शोषण, अत्याचार, हत्या आदी. सर्वोच्च न्यायालयानेही वेळोवेळी मृत्युदंडाच्या घटनात्मक वैधतेबाबत निर्णय दिले आहेत. भारतात मृत्युदंडाला पहिल्यांदा आव्हान जगमोहन सिंह विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य १९७२ च्या प्रकरणात देण्यात आले होते. न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ही सर्वंकष तपासणी अणि गंभीर मुल्यांकन केल्यानंतरच दिली जात असल्याचे सांगितले. यामुळे अशा प्रक्रियेत मृत्युदंडाची शिक्षा ही योग्य मानली गेली आणि भारतीयं घटनेच्या कलम २१ चे उल्लंघन करत नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. न्यायालयाने म्हटल्यानुसार शिक्षा ही अनेक न्यायिक सिद्धातांवर आधारित आहे. राजेंद्रप्रसाद विरुद्ध उत्तरप्रदेश राज्य-१९७९ यामध्ये न्यायालयाने सुनावणी करताना बदला घेण्याच्या विचाराला बाजूला ठेवत सामाजिक उद्देशाच्या रुपातून निवाडा आणि सुधारणात्मक सिद्धांताचा विचार करण्यावर भर दिला. शिवाय मृत्युदंडाच्या आदेशासाठी आवश्यक असणारे विशेष कारण हे गुन्ह्याशी संबंधित नसावे तर उलट आरोपीवर लक्ष केंद्रीत असावे. १९८० मध्ये बच्चन सिंह विरुद्ध पंजाब राज्य या प्रकरणात मृत्युदंडाच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देण्यात आले होते. या प्रकरणात अगोदर आजन्म जन्मठेप आणि मृत्युदंड यादरम्यानच्या पर्याय असणाऱ्या गुन्ह्यासाठी जन्मठेप देण्याच्या नियमासंबंधी मृत्युदंडाला अपवाद ठरविले. (घटनेतील कलम १४ हा समानतेचा अधिकार, कलम १९ हे स्वातंत्र्याचा अधिकार आणि कलम २१ नुसार व्यक्तिगत स्वातंत्र्याचा अधिकार असतो आणि त्यांना गोल्डन ट्रँगल म्हणून ओळखले जाते) मृत्युदंडाशी संबंधित बच्चन सिंह प्रकरणात अलावा मारू राम विरुद्ध भारतीय संघराज्य-१९८० या खटल्यांत देखील न्यायालयाने मृत्युदंडाची शिक्षा ही दुर्मीळातील दुर्मीळ प्रकरणातच द्यायला हवी आणि ती शिक्षा अपवादात्मक राहावी. प्रश्न असा की, आजच्या काळात हक्काबाबत अधिक जागरुकता वाढलेली असताना आणि प्रामुख्याने मानवाधिकाराशी संबंधित अनेक देशांनी मृत्युदंडाची शिक्षा कालबाह्य करण्यावर भर दिलेला असताना भारतात देखील मृत्युदंडाच्या घटनात्मक वैधेतेवर गांभीर्याने विचार करायंला हवा. वास्तविक रुपाने अशा प्रकारची शिक्षा ही मानवाधिकाराच्या विरोधात राहू शकते, परंतु कायद्याला बाजूला काढणे किंवा त्या आधारावर त्याला बेकायदा म्हणणे तर्कसंगत राहणार नाही. अशा प्रकारची शिक्षा कोणत्या परिस्थितीत दिली जाते, ते पाहावे लागेल. स्थिती दुर्मीळातील दुर्मीळ असेल तर मृत्युदंडाला तार्किक मानावे लागेल. मात्र एखादा खटला ठरलेल्या कालावधीपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहत असेल तर अशा प्रकरणातील दोषींना फाशीची शिक्षा दिली जात नाही, तेव्हा अशी स्थिती मानवी हक्क किंवा घटनेच्या सुवर्ण त्रिकोणाशी सुसंगत ठरणार नाही.

> सध्या देशभरात नव्या राष्ट्रीय सहकार धोरणाची चर्चा सुरू असून लवकरच याची घोषणा होणार आहे. या धोरणामुळे सहकारातून समृद्धीकडे हे उद्दिष्ट सफल होईल, सहकारी संघराज्य प्रणालीवर आधारित नवे मॉडेल विकसित होईल आणि तळागाळातील लोकांपर्यंत आर्थिक सुधारणा पोहोचविण्यासाठी मदत होईल. राज्याच्या भागीदारीतून सहकार क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक भागीदारी सुविधा विकसित करण्यात येईल. ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक वेगाने विकसित करण्यासाठी भर देण्यात येत आहे. खाजगी क्षेत्राचा वापर कमी होऊन सहकाराच्या विकासाची गती अधिक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. खाजगी क्षेत्रापेक्षाही ग्रामीण भागात सहकारी तत्त्वावर उद्योग विकासाला गती दिल्यामुळे नवे विकास कल समोर येतील. सहकारी चळवळीच्या प्रमाणबद्ध पद्धतशीर विकासासाठी हे नवे धोरण खरोखरच फायदेशीर ठरणार आहे.

## नवीन सहकार धोरण : दिशा आणि दृष्टी

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

भारताच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी २०२४ च्या अर्थसंकल्पात देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकार धोरणाचे सूतोवाच केले होते. हे धोरण सहकार क्षेत्रात समृद्धी, संपन्नता व स्वावलंबनाच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे असे वर्णन त्यांनी केले. देशाच्या सर्वांगिण आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि जीडीपी वाढविण्यासाठी हे धोरण संजीवनी ठरणार आहे. या अनुषंगाने, राष्ट्रीय सहकार धोरणाची निश्चिती करण्यासाठी माजी रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने विविध पातळीवर चर्चा, विचारमंथन व बैठका करून या धोरणाचा अंतिम आराखडा तयार केला आहे. हे धोरण काय आहे, त्याचे संभाव्य परिणाम काय होतील, याबाबत दिशा आणि दृष्टिकोन स्पष्ट करण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखामध्ये केला आहे.

या धोरणाचा आराखडा बारकाईने अभ्यासला असता काही यशसूत्रे समोर येतात. ती येथे मांडली आहेत. सहकार चळवळीला नवी दिशा देण्यासाठी श्री. सुरेश प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली ४८ सदस्यीय समिती नेमण्यात आली होती. या समितीमध्ये सहकार क्षेत्रामध्ये तन-मन-धन अर्पण करून काम करणारे कार्यकर्ते, सहकारातील ज्येष्ठ अधिकारी, केंद्र व घटक राज्यातील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, तसेच प्राथमिक पतसंस्थांचे प्रतिनिधी या सर्वांचा व्यापक प्रमाणावर समावेश करण्यात आला होता. या समितीने वर्षभर अभ्यास, चिंतन, मंथन करून जो अहवाल लिहिला आहे तो अहवाल सहकार चळवळीच्या भावी आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि शिक्षण यांना एकत्र गती देण्यासाठी आणि सहकार आधारीत नवे विकास मॉडेल तयार करण्यासाठी प्रोत्साहन देणे हे या धोरणाचे सूत्र आहे. राष्ट्रीय सहकार धोरणाचा मुख्य आधार ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे हा आहे. यासाठी, कृषी पतसंस्थांमध्ये उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी, राष्ट्रीय नवोपक्रम निधीची स्थापना करण्याची शिफारस करण्यात आली होती. यासाठी कृषी आणि संलग्न क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात १.५२ ट्रिलीयन एवढी तरतूद करण्यात आली आहे. सहकार धोरण सहकारी पतसंस्था मजबूत करणे आणि वित्त पुरवठा भक्कम करणे यावर भर देणार आहे. पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञान तयार करणे, उच्च दर्जाचे शिक्षण, प्रशिक्षण आणि संशोधनाला प्रोत्साहन देणे आणि सुशासन नेटवर्कची स्थापना करणे यावरही यामध्ये भर देण्यात आला आहे. नवीन धोरणामुळे सहकारातून समृद्धीकडे हे धोरण सफल होईल, सहकारी संघराज्य प्रणालीवर आधारित नवे मॉडेल विकसित होईल आणि तळागाळातील लोकांपर्यंत आर्थिक सुधारणा पोहोचविण्यासाठी मदत होईल. राज्याच्या भागीदारीतून सहकार क्षेत्रात डिजिटल सार्वजनिक भागीदारी सुविधा विकसित करण्यात येईल. आपले उत्पादन, साठवण आणि विपणन प्रणाली त्यामुळे मजबूत होईल. मोहरी, भुईमूग, तीळ, सोयाबीन, सूर्यफूल यासारख्या तेलामध्ये आत्मनिर्भरता गाठण्यासाठी या उपक्रमाद्वारे प्राधान्य देण्यात येणार आहे. भाज्यांची पुरवठा साखळी वाढविणे तसेच भाजीपाला उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात क्लस्टरच्या विकासासाठी प्रोत्साहित केले जात आहे. सहकारी संस्था आणि भाजीपाला पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामध्ये भाजीपाला संकलन, साठवण आणि विपणन यांचा समावेश आहे. नवीन सहकार धोरणात ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्यावर भर देण्यात आला आहे. त्यामुळे शहरे व खेडी यातील अंतर कमी होईल. अर्थशास्त्रज्ञ आणि उद्योग भागधारकांना असे वाटते की, ग्रामीण योजनांसाठी अर्थवाटप वाढविण्याच्या आणि ग्राहक केंद्री मागण्यांना चालना देण्यासाठी हे उपाय वरदान ठरतील. भाजीपाल्याप्रमाणे मच्छ व्यवसाय, गृहनिर्माण तसेच रोजगार वृद्धी या क्षेत्रात नवे बदल घडून येतील. विशेषतः २०१० च्या तुलनेत ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक वेगाने विकसित करण्यासाठी भर देण्यात येत आहे. खाजगी क्षेत्राचा वापर कमी होऊन सहकाराच्या विकासाची गती अधिक वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. खाजगी क्षेत्रापेक्षाही ग्रामीण भागात सहकारी तत्त्वावर उद्योग विकासाला गती दिल्यामुळे नवे विकास कल समोर येतील.

राष्ट्रीय सहकार धोरणावर नेमलेल्या या समितीने देशभरात १७ बैठका आणि ४ प्रादेशिक कार्यशाळा घेतल्या. त्यामध्ये राष्ट्रीय सहकार धोरणावर सर्व अंगांनी बारीकसारीक चर्चा करण्यात आली व त्यातून हा मसुदा विकसित करण्यात आला आहे. त्यामुळे या सहकार धोरणाची झलक काय असेल, त्यातील तरतूदी कोणत्या असतील, याविषयी जिज्ञासा व उत्सुकता वाढीस लागली आहे. या धोरणाला कृतीमध्ये आणण्यासाठी सहकार मंत्रालय विविध घटक राज्यांच्या सहकार खात्यांशी विचारपूर्वक चर्चा व सुसंवाद साधून नव्या धोरणाच्या अंमलबजावणीवर विचार विनिमय करीत आहे. या धोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा सहकारी दूध संघ स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे व ती खरोखरच स्वागतार्ह आहे. त्यामुळे देशातील सहकारी चळवळीला अधिक संघटित रूप येऊ शकेल आणि आपली धवलक्रांतीसुद्धा नव्या दिशेने अधिक प्रभावीपणे उजळू शकेल. ज्या जिल्ह्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका उघडण्यात आल्या नाहीत त्या जिल्ह्यांमध्ये अशा बँकांची स्थापना करण्यासाठी नाबार्डच्या मदतीने प्रयत्न करण्याचे घोषित करण्यात आले आहे. नाबार्डचे कव्हरेज मिळाल्यामुळे अशा आकांक्षी जिल्ह्यांमध्ये सहकारी चळवळीच्या समतोल विकासाला मदत होऊ शकेल. काही राज्यांमध्ये सहकारी चळवळ चांगल्या प्रकारे विकसित झाली आहे. काही राज्यामध्ये ती विकासाच्या मार्गावर आहे, तर काही राज्ये व काही जिल्हे हे पूर्णपणे मागासलेल्या टप्प्यावर आहेत. तेव्हा सहकारी चळवळीच्या प्रमाणबद्ध पद्धतशीर विकासासाठी हे नवे धोरण खरोखरच फायदेशीर ठरणार आहे.

सहकारी चळवळ तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी काय करावे? अनेक मार्ग आहेत. उत्तरेही आहेत. पण सरकारने ठरविले की, पायाभूत सुविधांच्या विकासाासाठी कोश तयार करण्यावर भर देण्यात येणार आहे. सरकारने दूध संस्थांच्या विकासासाठी राष्ट्रीय धोरण आखले आणि त्यास प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. कारण भारत आज जगातील दूध उत्पादन करणारा पहिला देश ठरला आहे. देशातील सर्व पंचायती, प्रत्येक खेडी आणि कानाकोपऱ्यापर्यंत सहकारी चळवळ पोहोचविण्याचा संकल्प केंद्र सरकारने केला आहे. देशातील अनेक भाग अजूनही सहकारी चळवळीपासून दूर आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली, पण सहकारी मूठभर राज्यांची व मूठभर लोकांची मक्तेदारी ठरली आहे. सहकाराचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. त्या दिशेने विचार करता, प्राथमिक सहकारी कृषी संस्था यांची संख्या वाढविणे व त्यांचा विस्तार करणे हे गरजेचे होते. मत्स्यव्यवसाय क्षेत्रात सहकारी संस्था स्थापन करण्यावर नवीन धोरणात भर देण्यात आला आहे.

सहकारी चळवळीचे समाजीकरण करणे आणि सहकाराला लोकाभिमुख करून सामान्य माणसापर्यंत पोहोचविणे हा नव्या राष्ट्रीय सहकार धोरणाचा आत्मा आहे. तसेच सहकारातून समृद्धीकडे जाण्याचा मार्ग हा सहकारी पतसंस्थांच्या माध्यमातून जातो. सितारामन यांनी आपल्या भाषणात ग्रामीण अर्थकारणातील क्रियाकल्पांना भक्कम करण्याची भूमिका मांडली होती. शेतीवर आधारलेले उद्योग विकसित करणे व त्याआधारे रोजगार निर्मिती करणे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय, अलिकडे भारतीय शेतमालाला आणि दुग्धजन्य पदार्थाला जगामध्ये मोठ्या प्रमाणात मागणी येत आहे. फळे, भाजीपाला, दूध तसेच मासे यांच्या उत्पादनामध्ये सहकारी चळवळीने दमदार पाऊल टाकल्यास, देशाच्या आर्थिक विकासाची गती आणखी वाढू शकते हे लक्षात घेतले पाहिजे. जगातील प्रत्येक कुटुंबाच्या नाश्ता व भोजनकक्षामध्ये एकतरी भारतीय पदार्थ बास्केटमध्ये दिसू लागेल. भारत जगातील पाचवी आर्थिक सत्ता बनला आहे व तिसऱ्या आर्थिक सत्तेच्या दिशेने घोडदौड करीत आहे. आपणासमोर अनेक संधी व अनेक आव्हाने आहेत. अशावेळी, सहकार चळवळीची दिशा निश्चित करून एक नवा दृष्टिकोन या धोरणाद्वारे देण्यात आला आहे. श्री. प्रभू यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या ४८ सदस्यीय सहकारी समितीने दिलेल्या शिफारशी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या शिफारशींचा गाभा काय असेल, तर सहकाराचे लोकशाहीकरण, सहकाराचे विवेकीकरण आणि सहकाराचे स्थानिकीकरण हा आहे.

सहकारातून रोजगार निर्मिती कशी होईल, सहकारी चळवळ अधिक शुद्ध, सात्विक आणि स्वच्छ कशी बनेल, यावर या धोरणात भर देण्यात आला आहे. त्यामुळे हे धोरण मागील धोरणाची मागील पानावरून पुढे पुनरावृत्ती नसून ते नवे स्वयंभू धोरण आहे. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी यासारख्या देशात पूर्वी सहकारी चळवळ होत्या, आजही आहेत. पण त्या मोडकळीस आल्या आहेत. या देशांचे कोणतेही अनुकरण न करता, आपले स्वतःचे सहकार धोरण ठरविणे ही गोष्ट आव्हानात्मक होती. पण सुरेश प्रभू यांनी ते शिवधनुष्य समर्थपणे उचलले आहे. महात्मा गांधी आणि दीनदयाळ उपाध्याय तसेच राम मनोहर लोहिया यांच्या विचारांची सूत्रे एकत्र करून, त्यांना व्यवहारी रूप देऊन सहकारी चळवळ लोकाभिमुख आणि ग्रामाभिमुख करण्याचा हा प्रयत्न आहे. कुठल्याही सहकारी चळवळीचे जेव्हा सरकारीकरण होते, तेव्हा त्यात हस्तक्षेप आणि गैरव्यवहार होण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे सहकाराला स्वतंत्रपणे स्वबळावर विकसित होण्यास वाव देणे महत्त्वाचे आहे. सहकारी चळवळीने आर्थिक विकासाच्या गगनात उंच गरूडझेप घ्यावी आणि सरकारने दुरून पहावे अशी त्यामागची भूमिका असते. यादृष्टीने विचार करता, नवे राष्ट्रीय सहकार धोरण, नव्या आशा आकांक्षा व अपेक्षा घेऊन येत आहे.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

**पंचांग** — **शनिवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद कृ. ११ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, इंदिरा एकादशी
**सूर्योदय** : स.०६.०६ **सूर्यास्त** : सायं.०६.०२ वा
**नक्षत्र** : आश्लेषा, **योग** : सिद्ध, **करण** : कौलव
**राहू काळ** : **सकाळी** : ९:०० ते १०:३०

**दिनविशेष**
*इ.स.पू. ५५१ कॉन्फ्युशियस या चिनी तत्वज्ञानाचा जन्म. *११९७: पवित्र रोमन सम्राट हेन्री सहावा याचा मृत्यू. *१८९५: लुइ पाश्चर या फ्रेंच संशोधकाचा स्मृतिदिन. त्यांनी पाश्चराइझेशन पद्धतीचा शोध लावून सूक्ष्मजीव शास्त्राचा पाया घातला. *१९०७ : शहीद भगतसिंह जन्मदिन, सशस्त्र क्रांतिकारी व समाजवादी विचारसरणी. *१९३९: दुसरे महायुद्ध- जर्मनीच्या सैन्याने पोलंडची राजधानी वॉर्स काबीज केली. *२८ सप्टेंबर १९२९ : स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा जन्म. *१९५८: फ्रांसने नवीन संविधान स्विकारले. फ्रांसचे पाचवे प्रजासत्ताक अस्तित्वात आले. *१९७१: ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू मॅथ्यू इलियट याचा जन्म. *१९७१: युनायटेड किंग्डमने औषधांचा गैरपावर कायदा काढून गांजाचे वैद्यकीय उपयोग बेकायदा ठरविले. *१९७८: पोप जॉन पॉल पहिले यांचे निधन. *१९४७ : बांगला देशाची पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांचा जन्म. *१९९४: एम.एस. एस्टोनिया हे फेरीबोट बाल्टिक समुद्रात बुडून ८५२ व्यक्ती मृत्युमुखी पडले.

**राशीभविष्य**
* **मेष** :बदलाची गरज भासेल. ***वृषभ** : आत्मविश्वास व मनोबल वाढेल. ***मिथुन** : थकलेली येणी वसूल होतील. ***कर्क** : सामाजिक क्षेत्रात प्रतीष्ठा उंचावेल. ***सिंह** : इच्छापूर्ती होईल. ***कन्या** : सहकाऱ्यांचे सहकार्य लाभेल. ***तुळ** : ध्येय साध्य करता येईल. ***वृश्चिक** : मोठे ध्येय गाठाल. ***धनु** : आर्थिक बाजू बळकट होईल. ***मकर** : हौसे-मजेखातर खर्च कराल. ***कुंभ** : विचार करून आपले मत द्या. ***मीन** : नवपरिणितांना गोड बातमी कळेल.

**मेसेज आया**
दरवाजा म्हणतो अतिथीचे स्वागत कर.
घड्याळ म्हणते काळाची पावले ओळख.
खिडकी म्हणते दुरदृष्टी ठेव. दुनियेचे भान ठेव.
देव्हारा म्हणतो पावित्र्य ठेव. मांगल्य जप.
छत म्हणते उच्च विचार ठेव. उच्च आकांक्षा ठेव.
जमीन म्हणते पावले मात्र माझ्यावरच राहू देत...

**व्यक्तीविशेष**

### लता मंगेशकर

पंडित आणि नाट्यअभिनेते दीनानाथ मंगेशकर यांची कन्या. आवाजात रसिकांना मोहिनी घालण्याची जादू. अगदी लहान वयातच गायला सुरुवात. पंडित दीनानाथांनी त्यांना गाण्याचे शिक्षण दिले. आवाजातील जतेला, उच्चारातील स्पष्टता आणि शब्दांचे अर्थपूर्ण गायन यामुळे गेल्या सहा-सात दशकांतील त्यांच्या आवाजाची जादू कमी झालीच नाही. त्यामुळे त्यांची गिनीज बुक मध्ये नोंद झाली आहे. त्यांच्या गायनाने अनेक संगीतकार, गीतकार आणि गायक प्रसिद्धीच्या झोतात आले. त्यांची धार्मिक मनोवृत्ती, राग, ताल, लय यांचे सांगोपांग ज्ञान आणि विनम्र वृत्ती यामुळे त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली आहे. म्हणूनच त्यांना भाराताची गानकोकीळा असे म्हणातात. भारतात चीन युद्धाच्या काळात कवी प्रदीप याचे 'ए मेरे वतन के लोगो!' या गाण्याने भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांना आपले अश्रू आवरले नाहीत. भारत सरकारने त्यांना भारतरत्न किताब देवून गौरविले आहे. (२००१)

**बोधकथा**

### मेंढीचे कातडे पांघरणारा लांडगा

एक लांडगा मेंढीचे कातडे पांघरुन एका मेंढ्यांच्या कळपात शिरला आणि त्याने बरेच दिवस मेंढरे मारुन खाण्याचा सपाटा चालविला. त्याच्या अंगावर मेंढीचे कातडे असल्यामुळे तो लांडगा असल्याचे कोणाच्याही लक्षात आले नाही. पण एके दिवशी त्याचे ढोंग बाहेर पडले आणि धनगराने त्याला लगेच पकडून ठार मारले. मग त्याने मेंढीच्या वेषात असलेल्या त्या लांगडग्याचे प्रेत इतर लांडग्यांनी धडा घ्यावा म्हणून एका झाडाला टांगून ठेवले. शेजारच्या धनगरांनी तो प्रकार पाहिला आणि मोठ्या आश्चर्याने त्यांनी विचारले; अरे मित्रा, तुझ्या स्वतःच्या मेंढ्यांपैकीच एक मेंढी तू अशी कां टांगून ठेवलीस? त्यावर तो म्हणाला, 'अरे तुम्ही नुसतं कातडं पाहून फसू नका; कारण हे कातडं उचलून त्याच्या खाली काय आहे हे जर तुम्ही पाहल तर एका लांडग्याचे प्रेत तुम्हाला दिसेल.' **तात्पर्य : नुसत्या देखाव्यावरुन किंवा पोशाखावरून माणसाच्या अंतःकरणाची परीक्षा होणे कठीण आहे.**

**भूगोल**

### सायकल

सायकल १८१७ मध्ये खऱ्या अर्थानने माणसाने दोन चाकीचा वापर करायला सुरुवात केली म्हणजेच सायकल अस्तित्वात आली. त्यावेळी तिचे स्वरूप हे प्राथमिक स्वरुपाचे होते. अलीकडच्या काळात जशा गिअरच्या सायकल्स आहेत, तशा त्यावेळी नव्हत्या. १८६५ मध्ये तिला 'बायसिकल' हे नाव मिळाले. १८८५ पर्यंतची वर्षे सायकलमध्ये किरकोळ बदल घडवून आणण्यात गेली. मात्र त्यानंतर आजच्या स्वरुपातील सायकल अस्तित्वात आली. आताची सायकल वेगाने सहज ताश १५ ते २० कि.मी. जाऊ शकते. स्पर्धेत चालणाऱ्या सायकल्स उतारावर ताशी ८० कि.मी. वेगानेही जातात. सायकलींचा उपयोग अलीकडच्या काळात कमी झाला असला तरी सायकलच्या कसरती सर्कसमध्ये अथवा चित्रपटांमध्ये देखील असून पाहावयास मिळतात. तसेच एक चांगला व्यायामप्रकार म्हणून देखील सायकलकडे अलीकडच्या काळात पाहिले जाते. हवेच्या आणि ध्वनी प्रदूषणाला पर्याय म्हणून वाहतुकीचे प्रमुख साधन म्हणून देखील आठड्यातून एकदा तरी सायकल चालवावी, असे देखील म्हटले जाते. एकूणच काय तर या दुचाकीचे वापर आणि उपयोग अनेक आहेत. आपण त्याकडे कसे पाहतो, हे महत्त्वाचे आहे.

**नवं संशोधन**

### आशियातील सर्वांत लांबीचा बोगदा तयार

चीनचे काही कामातील यश हे दुसऱ्या देशांना आश्चर्यचकित आणि बुचकळ्यात टाकणारे असते. असाच आश्चर्याचा धक्का या देशाने बोगदा तयार करुन दिला आहे. उल्लेखनीय म्हणजे हा बोगदा आशिया खंडातील सर्वांत लांबीचा ठरला आहे. चीनमधील शानक्सी प्रांतात आशियातील सर्वांत लांब म्हणजे तब्बल १६ किलोमीटर लांबीचा बोगदा बांधून तयार झाला आहे. या बोगद्यात दुहेरी रेल्वे लाईन्स असून तेथून हायस्पिड रेल्वेगाड्या धावणार आहेत. चिनी सरकारी वृत्तसंस्था शिन्हुआने दिलेल्या माहितीनुसार हा बोगदा आशियातील सर्वांत लांबीचा आहे. तसेच तो किलिंग पर्वत कापून तयार करण्यात आला आहे. या बोगद्यामुळे चीनच्या पश्चिमोत्तर भागातील शानक्सी नामक प्रांताची राजधानी शीआन व सिचुआनची राजधानी चेंगदू ही दोन प्रमुख शहरे हायस्पिड रेल्वे लाईनने जोडली जाणार आहेत. ही प्रमुख रेल्वेलाईन ६४३ कि.मी. लांब आहे. या बोगद्यातून तासाला २५० कि.मी. या वेगाने रेल्वे धावणार आहे. लवकरच या बोगद्यातून रेल्वे वाहतुकीस प्रारंभ होणार आहे. यामुळे दोन्ही राजधानी शहरातील अंतर केवळ तीन तासांत पूर्ण होणार आहे. हेच अंतर पूर्ण करण्यास सध्या १६ तास लागतात.हा बोगदा आता आशियातील सर्वांत लांबीचा ठरणार आहे.

**सोडवा सुडोकू**
सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४५०**

| | | | |
|---|---|---|---|
| | | 4 | |
| 4 | | | 1 |
| 3 | | | 2 |
| | 2 | | |

**क्रमांक ४४९ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 2 | 4 | 1 |
| 4 | 1 | 3 | 2 |
| 2 | 3 | 1 | 4 |
| 1 | 4 | 2 | 3 |

**हास्यविनोद**
**सरीता** : तू वापरते तोच साबण मीही वापरते, मग तुझ्या नवऱ्याचे कपडे एवढे स्वच्छ कसे?
**नीलिमा** : अग, मी कपडे धुताना त्यात माझा नवरा आहे, असे समजून धोपटते.. म्हणून!

**महिलायन**

### रडताना घाबरु नका

त्यांना 'इमोशनल टिअर्स' असं म्हटलं जातं. हे अश्रू प्रोटीन बेस्ड हार्मोन प्रोलेक्टीन, एंड्रेनोकॉर्टिकोट्रॉपिक म्हणजे एक प्रकारच्या वेदना शामक ल्यूसिन एन्केफेलिनपासून बनतात. मानवाचं शरीर तणावात किंवा दबावाखाली असेल तर अशावेळी या हार्मोन्सचं स्त्रवण होतं. दुसरे अश्रू आहेत 'बेजल टिअर्स.' ते लायसोजाईम्स नामक शक्तीशाली अँटीबॅक्टेरिअल तसंच अँटी व्हायरल एजेंटपासून बनलेले असतात आणि कोणत्याही प्रकारचे बॅक्टेरिया तसंच व्हायरस हे डोळ्यांचं संरक्षण करतात. डोळ्यामध्ये तशा प्रकारचे अश्रू नसतील तर आपली दृष्टी जाऊ शकते. 'रिफ्लेक्स टिअर्स' हा तिसरा प्रकार. हवा, पाणी, धूळ, धूर किंवा कांदा कापल्यामुळे अशा प्रकारचे अश्रू बाहेर येतात. ते बाहेर आल्यामुळे डोळ्यांना एक संरक्षक कवच प्राप्त होतं. इमोशनल टिअर्स सोडून अन्य दोन्ही प्रकारचे अश्रू डोळ्यांच्या संरक्षणाचं काम करतात. बहिणीचं-मुलीचं लग्न, घरापासून दूर असणं, भीती, आनंद किंवा विजय अशावेळी आपल्या डोळ्यातून जे अश्रू येतात ते इमोशनल टिअर्स. हे अश्रू आपल्या शरीरातून टॉक्सीन बाहेर काढण्याबरोबरच आपल्या मनावरील दबाव कमी करण्यासाठी उपयुक्त असतात. मनावर आणि हृदयावर दबाव असेल तर भविष्यात हृदयविकार, उच्च रक्तदाब, टाईप-२ डायबिटीस, स्थूलपणा अशा समस्या निर्माण होऊ शकतात. मानसोपचार तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार तणाव दूर करण्याबरोबरच अश्रू आपल्या भावनाही दुसऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचं काम करतात. त्यामुळे त्यांचं महत्त्व आणखीनच वाढतं. भारतीय संस्कृतीत एखादा पुरुष रडला तर तो कमकुवत आहे, असं मानलं जातं. लहानपणापासूनच त्याला तशी शिकवण दिली जातं. त्यामुळे सर्वसाधारणपणे पुरुष आपल्या भावना अश्रूंऐवजी संताप, चीड किंवा अन्य पद्धतीने व्यक्त करतात. पुरुषांवरील रडण्याची बंदी हटवण्यात आली तर चित्रपट पाहताना पुरुष रडणं हे अगदी सर्वसामान्य होऊन जाईल. थोडक्यात रडणं हे आरोग्याच्या दृष्टीने खूप लाभदायी आहे. मग ते मानसिक आरोग्य असो किंवा शारीरिक. मग, रडताना जराही संकोच बाळगू नका. **(उत्तरार्ध)**

**घरगुती औषध**

### किराईत

काडेकिराईत तापावर उत्तम औषध आहे. कोणत्याही प्रकारचा ताप किराईताने बरा होतो. संग्रिपातज्वर म्हणजे एकसारखा उतरता न येणारा मोठा ताप, यावर किराईत ठरलेले औषध आहे. वीस ग्रॅम काडेकिराईत कुटून एक ग्रॅम सुंठ ठेचून या दोहोंचा अर्धा लिटर पाणी घालून मंदाग्नीवर अष्टमांश काढा करावा आणि तो सांजसकाळ घ्यावा, याने घाम येऊन तवरित ताप उतरतो. हे जीर्णज्वरावरही उत्तम औषध आहे. १० ग्रॅम किराईत किंचित ठेचून ३० ग्रॅम कढत पाण्यात राजी भिजत घालावे. सकाळी ते पाणी गळून त्यात १० ग्रॅम मध व ३ ग्रॅम खडीसाखर घालून द्यावे.जीर्णज्वर निघतो.चांगली भूक लागून शक्ती येते.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

### ५ ऑक्टोबरपर्यंत घेणार काढता पाय

# पावसाचा जोर ओसरणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यात सध्या परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत आहे. मात्र आता राज्यात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता आहे, असा अंदाज ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी वर्तवला आहे.

२८ सप्टेंबरपासून आठवडाभर म्हणजे शनिवार दिनांक ५ ऑक्टोबरपर्यंत खान्देश, नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर व सोलापूर व मराठवाड्यासह १८ जिल्ह्यात केवळ ढगाळ वातावरण राहून हळूहळू पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता जाणवते. तुरळक ठिकाणी किरकोळ पावसाची शक्यता असल्याची माहिती खुळे यांनी दिली आहे. तसेच मुंबईसह कोकण व विदर्भातील १८ जिल्ह्यात मात्र अशा प्रकारची उघडीपीची परिस्थिती १ ते ५ ऑक्टोबर दरम्यानच्या पाच दिवसात जाणवू शकते, असे खुळे म्हणाले.

येत्या तीन दिवसात कोकणातील मुंबई शहर व उपनगर, ठाणे व उपनगर, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा ७ जिल्ह्यात तर मध्य महाराष्ट्रातील नंदूरबार, नाशिक, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर अशा ६ जिल्ह्यात अशा एकूण १३ जिल्ह्यातील तापी, गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यात मात्र पूर पाण्याची तीव्रता वाढू शकते, अशी माहिती खुळे यांनी दिली आहे.

### ऑक्टोबरमधील स्थिती काय?

● ६ ऑक्टोबरनंतर पुन्हा पावसाची सक्रियता वाढून १३ ऑक्टोबर पर्यंत म्हणजे आठवडाभर महाराष्ट्रात पुन्हा मध्यम ते



जोरदार पावसाची शक्यता जाणवत असल्याचे खुळे म्हणाले. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यानंतर म्हणजे १६ ऑक्टोबरनंतर मान्सून केव्हाही निरोप घेऊ शकतो. अर्थात मान्सून निघून गेला तरी चक्रीवादळाचा सीझन चालु होत असल्यामुळे ऑक्टोबर महिन्याअखेर महाराष्ट्रात पावसाची शक्यता नाकारता येत नसल्याचे खुळे म्हणाले.

## 'जरांगेंच्या आंदोलनाचा पवार पहिला बळी'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** जरांगे यांच्या मराठा आंदोलनाचा शरद पवार हे पहिला राजकीय बळी ठरतील, असे वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवार उभे केले नाही, तर ते शरद पवारांच्या इशाऱ्यावर चालत होते हे स्पष्ट होईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

शरद पवार हे केवळ मराठा नेते झाले आहेत, अशी स्थिती मराठा आंदोलनामुळे निर्माण झाली आहे. आजपर्यंत ते मराठा आरक्षणाबाबत जरांगे यांची मागणी टाळत आले. मात्र, रत्नागिरीच्या सभेत त्यांनी जरांगे यांच्या मागणीला पाठिंबा दर्शवला. त्यामुळे ओबीसी नेते बोलत होते त्याप्रमाणे शरद पवार केवळ मराठ्यांचे नेते आहेत, यावर शिक्कामोर्तब झाले असल्याचे ते म्हणाले.

'मराठवाड्यात जरांगे आणि ओबीसी असा उघड लढा आहे. उर्वरित महाराष्ट्रात लढ्याची तीव्रता शाब्दिक नाही पण मानसिक आहे. विधानसभा निवडणूकीनंतर ओबीसी आरक्षण जाईल अशी त्यांची धारणा झाली आहे. उद्धव ठाकरेदेखील ओबीसींचे आरक्षण वाढवून मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी अनुकुल आहेत. आता शरद पवार यांनीही जरांगेंच्या भूमिकेला समर्थन दिले आहे. जरांगे निवडणूक लढणार नसतील तर, ते पवारांच्याच इशाऱ्यावर चालत आहेत, असे समजू, असेही त्यांनी सांगितले.

### ओबीसीतून आरक्षण मिळणार नाही

● लोकसभा निवडणूकीत दलित, मुस्लीम समाजाने संविधान वाचवण्याच्या मुद्द्यावर इंडिया आघाडीला मतदान केले होते. आरक्षण हा घटनेतील महत्वाचा मुद्दा आहे. तो काढून घेण्याचे काम इंडिया आघाडी करत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूकीत तो समाज महाविकास आघाडीच्या बाजूने उभा राहील, असे वाटत नसल्याचे ॲड. आंबेडकर यांनी सांगितले. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण कधीच मिळणार नाही. कारण यापूर्वी दोन वेळा हे आरक्षण कोर्टाने फेटाळले आहे. एसटी प्रवर्गातून धनगर आरक्षण मिळण्याबाबत आंबेडकर म्हणाले की, न्यायालयानेच धनगर आणि धनगड हे दोन्ही समाज वेगवेगळे असल्याचे स्पष्ट केल्याने या मागणीत आता अर्थ उरला नाही.

## राऊत यांचे धर्मपरिवर्तन : बोंडे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**अकोला :** संजय राऊत यांना धर्मवीर कधीच आठवणार नाही. त्यांना औरंगजेब व टिपू सुलतान आठवेल. त्यांचे धर्मपरिवर्तन झाले आहे. फक्त ते नमाज पठणाला कुठे जातात, हे शोधावे लागेल, अशा शब्दात खासदार अनिल बोंडे यांनी राऊतांवर टीका केली.

ते म्हणाले की, हिंदू संस्थान व मंदिरांबाबत सातत्याने संभ्रम निर्माण केला जात आहे. नागपूर येथील कोराडी संस्थान अनेकांचे कुलदैवत आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात याची प्रगती झाली. ८०० विद्यार्थ्यांना एक रुपयात शिक्षण देत आहेत. संजय राऊत, नाना पटोले, अनिल देशमुख कोराडी माते संदर्भात बोलत आहेत. यांची माताही तीच आहे. काँग्रेस नेत्यांनी नागपूरमध्ये किती जमिनी लाटल्या? सतीश चतुर्वेदी यांनी किती हेक्टर जमीन लाटली?

इन्फोग्राफिक्स

## अफजल खानालाही दफनासाठी जागा मिळाली

### अक्षय शिंदेच्या वकिलांची कैफियत

**ठाणे :** बदलापूर येथील एका शाळेत दोन लहान मुलींच्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलीस एनकाऊंटरमध्ये मृत्यू झाला. अक्षयचा मृतदेह दफन करण्यासाठी जागा मिळत नसल्याची बाजू त्याचे वकील अमित कटारनवरे यांनी न्यायालयासमोर मांडली. अफजल खानाचा वध झाला होता तेव्हा त्याचा मृतदेह सुद्धा विधिवत पद्धतीने दफन करण्यात आला होता, असा मुद्दा त्यांनी मांडला. यावर कोर्टाने सांगितले की, लवकरत लवकर सरकारने मृतदेह दफन करण्यासंदर्भात काम करावे. पण सरकारी अधिकारी मृतदेह ताब्यात घेण्यासाठी कुटुंबियांना सहकार्य करत नाहीत. साधी स्वाक्षरी देण्यासाठी अधिकाऱ्यांना वेळ नाही, अशी बाजू वकील कटारनवरे यांनी मांडली. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण आहे. माँ जिजाऊ यांनी शिवबांना सांगितले की वैर अफजल खान याच्याशी होतं. तो मेला आहे तर त्याचं शरीर कुत्रा आणि कोल्ह्याने खाल्लेले हे आपल्याला शोभणार नाही. त्यानंतर अफजल खान याचा मृतदेह दफन करण्यात आला. प्रत्येक व्यक्तीच्या मृतदेहावर व्यवस्थित पद्धतीने अंतिम संस्कार झाले पाहिजे हा कायदा आहे तो आम्ही लागू करून घेऊ. पोस्को गुन्हा हा संसदेत पारित झाला, मग त्यावर एखाद्या आरोपीची सुनावणी लवकर झाली पाहिजे. पण आपल्या इथे कोर्ट, न्यायाधीश यांची कमतरता आहे त्यासंदर्भात सरकार कधी विचार करणार आहे का, असा प्रश्न त्यांनी विचारला. पोलिसांनी अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यासंदर्भात जागा उपलब्ध करुन द्यावी, असे न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले. सोमवारपर्यंत मृतदेह दफन करण्याची कारवाई करावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणात आता सोमवारी सुनावणी होणार आहे. या दफनविधीच्या कारवाईची माहिती कोर्टात सादर करण्याचे पोलिसांना निर्देश देण्यात आले आहेत.

» Selected

## शालेय पोषण आहारातील चॉकलेटमध्ये आढळल्या अळ्या

**धुळे :** धुळ्यातील साक्री तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत शालेय पोषण आहार अंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या चॉकलेटमध्ये चक्क जिवंत अळ्या आढळल्या. या प्रकारामुळे पालकांकडून संताप व्यक्त केला जात असून शासनाचा विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ सुरू आहे का, असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये शाळा आणि अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. शालेय पोषण आहार हा याच योजनेतील एक भाग आहे. शाळेच्या मधल्या सुट्टीत शालेय पोषण आहार दिला जातो. याआधी मुलांना धान्य दिले जात होते. मात्र, आता शाळेतच अन्न शिजवून दुपारच्या वेळी विद्यार्थ्यांना दिले जाते. यासोबत आता चॉकलेट देखील दिले जात आहेत. मात्र या चॉकलेटमध्ये अळ्या असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

## राज ठाकरे यांचे मिशन विदर्भ सुरू

**अमरावती :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मिशन विदर्भ सुरु केले आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे दोन दिवस अमरावती दौऱ्यावर आहेत. राज ठाकरेंच्या अमरावती दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर मनसे कार्यकर्त्यांनी शहरात जोरदार बॅनरबाजी केली आहे. यातील एका बॅनरवर ठाकरे घराण्यातील स्वाभिमानी भावी मुख्यमंत्री हिंदू जननायक असा राज ठाकरेंचा उल्लेख करण्यात आला आहे. सकाळी ७ वाजता अमरावतीत रेल्वे स्टेशनवर राज ठाकरेंचे मनसे कार्यकर्त्यांकडून जोरदार स्वागत करण्यात आले. विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांशी त्यांनी चर्चा केली. शुक्रवारी पश्चिम विदर्भातील अमरावती,बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ या पाच जिल्ह्यांचा आढावा घेतला. तर शनिवारी पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा,भंडारा,गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यांचा आढावा घेतला जाणार आहे.

## खडसे यांच्या निर्णयाने राष्ट्रवादीत फूट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जळगाव :** एकनाथ खडसे यांना पक्षाने स्वीकारले असले तरी आपण त्यांना स्वीकारले नसल्याचे सांगत माजी मंत्री आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते डॉ. सतीश पाटील यांनी खडसे यांच्या राष्ट्रवादीमध्येच राहणार असल्याच्या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे.

भाजपमध्ये जाण्याच्या वाटेवर असलेल्या खडसे यांनी जयंत पाटील यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शिवस्वराज्य यात्रेत सहभाग घेतला. त्यावेळी केलेल्या भाषणात आपण राष्ट्रवादी पक्षातच होतो आणि राष्ट्रवादीमध्येच राहणार असल्याचे खडसे यांनी जाहीर केले. तर सतीश पाटील यांच्यावर जाहीर सभेतच खडसेंनी उपरोधिक टीका केली होती.

खडसेंच्या टीकेनंतर डॉ. सतीश पाटील यांनी म्हटलं आहे की, खडसे हे सोयीचे आणि आपल्या कुटुंबाच्या हिताचे राजकारण करत आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गटात एकनाथ खडसे यांचे पुनरागमन झाल्याने पक्षात दोन गट पडल्याचे दिसून येत आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खडसे यांच्या सारख्या बड्या नेत्याने राष्ट्रवादी पक्षातच राहण्याच्या निर्णयानंतर खडसे आणि माजी मंत्री डॉ. सतीश पाटील यांच्यात एकजूट घडविण्याचे मोठे आव्हान राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या समोर आहे.

दरम्यान, खडसे यांनी राष्ट्रवादीतच राहणार असल्याचा निर्णय घेतल्यानंतर मुक्ताईनगरचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी खडसेंवर जोरदार टीका केली होती. खडसे रंग बदलणारे सरपटणारे प्राणी आहेत. आपण आमदार झाल्याचे त्यांना सहन होत नसल्याने आणि वयामुळे ते भ्रमिष्ट झाले आहेत म्हणून ते काहीही बोलतात आणि वागतात. त्यांना आपण फारसे गंभीरतेने घेत नाही, असे पाटील यांनी म्हटले होते.

## बजरंग सोनवणे यांच्या निवडीला आव्हान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** बीड लोकसभा मतदारसंघात भाजपच्या दिग्गज नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव करणारे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे बजरंग सोनवणे यांची खासदारकी रद्द करण्यासाठी हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीला आव्हान देणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आली आहे.

माजी नगरसेवक अमर नाईकवाडे, नारायण शिरसाट यांनी सदर याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या. ए. एस. वाघवसे यांच्यासमोर सुनावणी झाली असता सोनवणे यांच्यासह सर्व प्रतिवाद्यांना नोटीस बजावण्यात आली. २४ ऑक्टोबर रोजी याचिकेवर पुढील सुनावणी होईल. सोनवणे यांनी बीडच्या हायहोल्टेज लढतीत विजय खेचून आणला होता. काही मतदान केंद्रावरील मतांवर आक्षेप घेण्यात आलेला आहे.

## देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयावर महिलेचा हल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रालयातील कार्यालयावर एका महिलेने हल्ला केल्याने मंत्रालय परिसरात खळबळ उडाली. ही महिला फडणवीसांच्या कार्यालयापर्यंत पोहोचल्याने आश्चर्य व्यक्त केले जात होते.

यावर फडणवीस म्हणाले की, या महिलेने उद्विग्नतेतून हल्ला केला का? हे जाणून घेऊ. तिने कशामुळे हे पाऊल उचलले हे समजून घेऊ. हल्ला करणाऱ्या महिलेची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आलं आहे. धनश्री सहस्त्रबुद्धे असं महिलेचं नाव असून ही महिला घरी एकटीच राहते. आई वडिल काही वर्षापुर्वीच मरण पावले आहेत. या महिलेनं गुरुवारी रात्री इमारतीच्या लिफ्टचा दरवाजा तोडला. सीसीटीव्हीमार्फत महिलेची ओळख पटली आहे. फडणवीसांच्या कार्यालयावर हल्ला करणारी महिला दादरमधील एका सोसायटीतील रहिवासी आहे. सोसायटीत देखील ती चाकू घेऊन फिरत असल्याची माहिती आहे. ती लोकांच्या दारावर झाडू मारत फिरत असते.

महिला मनोरुग्ण असल्याची माहिती असून पोलिसांकडून महिलेचे समुपदेशन करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. पोलिसांना जबाब देण्याकरीता महिला तयार नाही. सदर महिला दरवाजा उघडत नसल्याने पोलिसांची अडचण झाली होती. महिला पोलिसांना देखील पाचारण करण्यात आले.

'अभिनेता सलमान खानसोबत मला लग्न करायचंय, नंबर द्या असे ती म्हणते. संबंधित महिला यापूर्वी सुद्धा मंत्रालयात अनेकदा आली होती. अनेक राजकीय नेत्यांना ती सातत्याने फोन करुन सलमानचा नंबर मागते. यापूर्वी भाजपा कार्यालयात जाऊनही तिने धमकावले होते, त्याची रितसर तक्रार त्यावेळी करण्यात आली होती.

### पोलिसांवर कारवाई होणार?

● सचिव गेटने ही महिला पास न घेता जात असताना या महिलेला अडवले का नाही? उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयाच्या बाहेर चार पोलीस नेहमी तैनात असतात मग यावेळी पोलिस का उपस्थित नव्हते? असे सवाल सध्या उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे या दोन्ही पॉईंटची जबाबदारी असलेल्या पोलिसांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

## मविआला मतदान नको; ओबीसी समन्वय समितीचा ठराव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नांदेड :** शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीमधील कुठल्याच उमेदवाराला मतदान करू नका असा ठराव ओबीसी समन्वय समितीने केला आहे. पवारांनी केलेल्या वक्तव्यावर महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गटाने भूमिका स्पष्ट करावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली. नांदेडमध्ये ओबीसी समन्वय समितीच्या बैठकीत ही मागणी करण्यात आली. मनोज जरांगे यांची मराठा आरक्षणाची मागणी योग्य आहे, पण इतरही समाजाचा विचार करावा असे वक्तव्य शरद पवार यांनी काही दिवसापूर्वी केले होते. त्याला ओबीसी समन्वय समितीने आक्षेप घेतला आहे.

ओबीसी, एससी, एसटी समन्वय समितीने शुक्रवारी विश्रामगृह येथे पत्रकार परिषद घेत ही माहिती दिली. शरद पवार यांच्या या वक्तव्याने ६० टक्के ओबीसी लेकरांच्या नरड्यावर पाय दिल्याची प्रतिक्रिया ओबीसी समितीचे नेते अविनाश भोसीकर यांनी दिली.




विधानसभेच्या निवडणुकीत शरद पवारांना तसेच महाविकास आघाडीतील मित्र पक्षांनासुद्धा मतदान करू नका असे आवाहन यावेळी ओबीसी समन्वय समितीने केले. महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट यांनी आपली भूमिका आधी जाहीर करावी की ते शरद पवार यांच्या विधानाच्या बाजूने आहे की नाही, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## मुंबई सिनेटमध्ये युवा सेनेचे वर्चस्व; ८ जागा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या बहुप्रतिक्षित सिनेट निवडणुकीचे दहा पैकी आठ जागांचे निकाल समोर आले आहेत. या आठही जागांवर युवासेनेच्या उमेदवारांचा विजय झाला आहे. पालघरचे भाजप खासदार हेमंत सावरा यांच्या बहीण निशा सावरा यांचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. निशा सावरा यांचे वडील विष्णू सावरा हे माजी आदिवासी मंत्री आहेत.

महिला प्रवर्ग जागेवर युवासेनेच्या उमेदवार स्नेहा गवळी यांनी अभाविपच्या रेणूका ठाकूर यांचा तब्बल ५९१४ एवढ्या दणदणीत मतांनी पराभव केला आहे.



एससी प्रवर्गातून युवासेनेचे शीतल शेठ देवरुखकर यांनी अभाविपचे राजेंद्र सायगावकर यांचा ५४८९ मतांनी पराभव केला. ओबीसी प्रवर्गातून युवासेनेचे मयूर पांचाळ यांनी अभाविपचे राकेश भुजबळ यांना ५३५० मते मिळवत पराभूत केले.

एसटी प्रवर्गातून धनराज कोहचडे हे युवा सेनेचे उमेदवार होते.त्यांनी निशा सावरा यांचा मोठा पराभव केला. युवासेनेचे उमेदवार धनराज कोहचडे यांना ५२४७ मते मिळाली तर अभाविपच्या निशा सावरा यांना केवळ ९२४ मतांवर समाधान मानावं लागलं.

एनटी प्रवर्गातून युवासेनेचे शशिकांत झोरे यांनी अभाविपचे अजिंक्य जाधव यांना हरवले. त्यांना ५१७० मते मिळाली तर अजिंक्य जाधव यांना केवळ १०६६ जागांवर समाधान मानावं लागलं.


### वयोमर्यादेसह होर्डिंग टॅक्स व इतर विषयांवर पक्षांचे प्रस्ताव

## निवडणूक आयोगाला महत्त्वाच्या सूचना

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाची सर्व राजकीय पक्षांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत काही नेत्यांनी निवडणूक आयोगाला महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महाविकासआघाडी विरुद्ध महायुती अशी लढत होणार आहे. सध्या सर्वच पक्ष मैदानात उतरले आहेत. एकीकडे पक्षांमध्ये जागावाटप, मुख्यमंत्रिपद याबद्दल चर्चा सुरू असताना दुसरीकडे सत्ताधारी-विरोधकामध्ये जोरदार आरोप-प्रत्यारोप पाहायला मिळत आहेत. त्यातच केंद्रीय निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्र दौरा आयोजित करण्यात आला आहे.




दोन दिवस केंद्रीय निवडणूक आयोगाचे अधिकारी मुंबई दौऱ्यावर आहेत. याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीदरम्यान निवडणूक आयोगाला काही सूचना करण्यात आल्या. या बैठकीनंतर माजी खासदार राहुल शेवाळे यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. राहत्या घरी मतदानाचा हक्क द्यावा, अशी मागणी माजी खासदार राहुल शेवाळे यांनी केली.


यावेळी शिवसेनेचे पाच - सहा नेते या बैठकीला उपस्थित होते. वयोवृध्दांचं वय ८५ वरून ८० पर्यंत आणावं. तसेच राहत्या घरी मतदानाचा हक्क द्यावा, अशी विनंती यावेळी निवडणूक आयोगाला केली अशी माहिती राहुल शेवाळे यांनी दिली. होर्डिंग बॅनरचा टॅक्स हा समान असावा.

महानगरपालिकेचा वेगळा आहे. त्यामुळे हा खर्च एकसारखा असावा, अशी मागणीही केली. तसेच निवडणूक खर्चाची २० लाखाची मर्यादा वाढवा. पीडब्ल्यूडीचा जो रेट आहे तो रेट न धरता मार्केट रेट धरावा, अशी मागणीही शेवाळे यांनी केली.

### टप्प्यात निवडणुका घ्या

● काही मतदान केंद्रावर पाण्याची व्यवस्था नव्हती. काही ठिकाणी मोठी रांग असल्याने मतदान करायला मिळाले नाही. या सगळ्या त्रुटी दूर व्हायला हव्या अशी मागणीही निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना केली. तसेच टप्प्यात निवडणुका घ्या अशी मागणीही यावेळी करण्यात आली, असे शेवाळे यांनी म्हटले.

# विश्ववेध




## जगातील एकमेव बाळ; दोनदा घेतला आईच्या पोटातून जन्म

कधीकधी अशा काही गोष्टी कानावर पडतात की, त्या विचार करायला भाग पाडतात. काही गोष्टींवर तर विश्वास ठेवायचा की नाही, असा प्रश्न अनेकांना पडतो; पण कधीकधी अशा गोष्टी खरोखर घडत असतात, ज्याला लोक चमत्कार असे नाव देतात. अशीच एक बातमी सध्या समोर आली आहे, जी ऐकून नक्कीच धक्का बसेल.

नऊ महिने आई आपल्या बाळाला गर्भात वाढवते. बाळाची प्रत्येक हालचाल आईला जाणवत असते. त्याचे फिरणे, त्याचे लाथ मारणे आईला जाणवते. आई हे सर्व सहन करत आपल्या बाळाला जन्म देते. आपल्या बाळाला आई पोटात देखील सुरक्षित ठेवते आणि जन्मानंतर देखील त्याची काळजी तितक्याच प्रेमाने घेते. नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर बाळ जन्माला येते. बाळ जन्माला आल्यानंतर त्याची नाळ कापून डॉक्टर त्याला आईपासून वेगळे करतात आणि गर्भातून बाहेर काढतात. पण, एक घटना अशीही घडली आहे, ज्यात एकाच बाळाने दोन वेळा जन्म घेतला. दोनदा जन्माला आलेले हे जगातील एकमेव बाळ आहे. आईच्या गर्भातून हे बाळ बाहेर काढण्यात आले. यानंतर पुन्हा एकदा हे बाळ आईच्या गर्भात टाकण्यात आले. यामुळे या महिलेने दोनदा प्रसूतीचा अनुभव घेतला आहे. लिसा कॉफी असे या महिलेचे नाव आहे, जिने एका बाळाला दोनदा जन्म दिला. लिसा यूकेमधील केंटची रहिवासी आहे. लिसाने मातृत्वाचा अत्यंत विलक्षण अनुभव घेतला आहे. सहाव्या आणि नवव्या महिन्यात असे दोनदा लिसाच्या बाळाने जन्म घेतला. सहाव्या महिन्यात लिसाचे बाळ ऑपरेशनच्या साह्याने गर्भाशयातून बाहेर काढण्यात आले; परंतु पुन्हा तिच्या बाळाला गर्भाशयात टाकण्यात आले. यानंतर नऊ महिन्यानंतर पुन्हा लिसाची नॉर्मल प्रसूती झाली. लिसाने गोंडस मुलीला जन्म दिला. लिसाच्या मुलीचे नाव लुका असे ठेवले आहे. लुकाचा जन्म हा वैद्यकीय चमत्कारच म्हणावा लागेल. आईच्या गर्भात असतानाच लुकाला स्पिना बिफिडा हा दुर्मीळ आजार झाला होता. या आजारामुळे आईच्या गर्भातच लुकाच्या पाठीच्या कण्याला संसर्ग झाला होता. अशा स्थितीत हा गर्भ वाढला असता तर संसर्ग आणखी वाढून धोका निर्माण झाला असता. याच कारणामुळे २७ आठवड्यांत भ्रूण गर्भाशयातून बाहेर काढण्यात आले आणि शस्त्रक्रिया करून भ्रूण पुन्हा गर्भाशयात टाकण्यात आले. यानंतर गर्भाची वाढ पूर्ण झाल्यावर नऊ महिन्यांनी लिसाची प्रसूती करण्यात आली. जन्मानंतरही लुकाला नवजात अतिदक्षता विभागामध्ये ठेवण्यात आले. तिच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यावर तिला डिस्चार्ज देण्यात आला.

## पृथ्वीच्या गर्भात काय?



पृथ्वीच्या गर्भात काय आहे, असा प्रश्न कधी ना कधी नक्कीच पडला असेल. हेच पाहण्याचा एका व्यक्तीने प्रयत्न केला. ही व्यक्ती पृथ्वीच्या गर्भात गेली. आतमध्ये जे दिसले ते दृश्य पाहून सर्व जण थक्क झाले आहेत. याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

एलिसन गुहा ही अमेरिकेच्या जॉर्जियामध्ये आहे. ॲपलाचियन पठारावरील पिजन माउंटनवर वॉकर काउंटीमध्ये ही गुहा आहे. ही युनायटेड स्टेटस्‌मधील १२ वी सर्वात खोल गुहा आहे, ज्याला फॅन्टॅस्टिक पिट असे नाव देण्यात आले आहे. गुहा १२ मैल (१९.३१ किमी) लांब आणि १०६३ फूट (३२४ मीटर) खोल आहे. या इतक्या खोल गुहेत एक व्यक्ती दोरीच्या मदतीने उतरली. आतील फोटो काढले.


जे सोशल मीडियावर पोस्ट करण्यात आले असून, दृश्य पाहून लोक थक्क झाले. या गुहेत यूट्यूबरनी आत कॅमेरा सोडला आणि आतील दृश्य दाखवले होते. जसजसा कॅमेरा आत खोलवर गेला तसतसे अद्भुत आणि भीतिदायक दृश्य दिसू लागले. कुणी आपल्याला विचित्र आकृत्या, तर कुणी भूत दिसल्याचेही सांगितले.

## आठ अब्ज वर्षांनंतर...

अंतराळाच्या अनंत पसाऱ्यातील कुठल्याशा भागातून तब्बल आठ अब्ज वर्षांचा दीर्घप्रवास करून रेडिओ लहरींचा एक समूह आता पृथ्वीपर्यंत पोहोचला आहे. हे रहस्यमय आणि शक्तिशाली रेडिओ सिग्नल्स आतापर्यंत पाहण्यात आलेले सर्वात दूरस्थ आणि ऊर्जावान रेडिओ संकेतांपैकी एक आहेत. अशा सिग्नलला 'फास्ट रेडिओ बर्स्ट' म्हणजेच 'एफआरबी' असे म्हटले जाते. रेडिओ लहरींच्या केवळ मिलीसेकंदापर्यंत राहणाऱ्या चकाकीला 'एफआरबी' असे म्हटले जाते. मात्र असे रेडिओ सिग्नल्स नेमके येतात कुठून याबाबतचे गूढ अद्याप कायमच आहे!

फास्ट रेडिओ बर्स्ट निमिषार्धात गायब होतात, मात्र ते संपूर्ण आकाशगंगेपेक्षाही अधिक चमकदार असू शकतात. गेल्या काही वर्षांमध्ये शेकडो एफआरबीएस डिटेक्ट करण्यात आले आहेत. मात्र त्यांच्या स्रोताचा छडा लागला नाही. 'एफआरबी २०२२०६१० ए' ला सर्वप्रथम १० जून २०२२ मध्ये डिटेक्ट करण्यात आले होते. नवा 'एफआरबी २०२२०६१० ए' थोडा विचित्रच आहे, कारण तो ब्रह्मांडाच्या मध्यभागी फुटला होता. त्यामुळे तो आतापर्यंतचा सर्वात दूरस्थ आणि सर्वात शक्तिशाली उदाहरण बनलेला आहे. त्याने एका क्षणातच इतकी ऊर्जा उत्सर्जित केली, जितकी आपला सूर्य तीस वर्षांच्या काळात उत्सर्जित करतो! ज्यावेळी वैज्ञानिकांनी हबल स्पेस टेलिस्कोपच्या सहाय्याने 'एफआरबी २०२२०६१० ए' वर नजर टाकली त्यावेळी हा सिग्नल अधिकच रंजक बनला. हा 'एफआरबी' ज्या ठिकाणाहून आला होता, ते आाकाशगंगांचा एक समूह होता. ज्यावेळी ब्रह्मांड केवळ ५ अब्ज वर्षे जुने होते, त्यावेळी या आकाशगंगा अस्तित्वात होत्या. पूर्वीचे बहुतांश एफआरबी एकाकी आकाशगंगांमधून आलेले आहेत. या 'एफआरबी'च्या सहाय्याने आपल्याला ब्रह्मांडाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येऊ शकेल, असे संशोधकांना वाटते. काही संशोधकांच्या मते हे 'एफआरबी' मॅग्नेटर्सशी निगडीत असू शकतात. ताऱ्यांच्या स्फोटांनंतर मागे राहणाऱ्या अवशेषांमध्ये मॅग्नेटर हा अतिशय ऊर्जावान अवशेष असतात.





## अबब! 33 कोटींचं पत्र

जगाला सापेक्षतावादाचा सिद्धांत देणारे महान संशोधक अल्बर्ट आईनस्टाईन यांनी लिहिलेल्या एका पत्राचा नुकताच लिलाव करण्यात आला. या पत्राला तब्बल ३३ कोटी रुपये किंमत मिळाली आहे. या पत्रात शास्त्रज्ञ आईनस्टाईन यांनी काही वैज्ञानिक इशारे पुन्हा एकदा जगासमोर आणले होते. १९३९ साली आईनस्टाईन यांनी अमेरिकेचे राष्ट्रपती फ्रँकलिन डी रुजवेल्ट यांना लिहिले होते. यात त्यांनी अणुबॉम्ब आणि त्याचा शस्त्र म्हणून होणारा वापर याबाबत इशारा दिला होता. त्यानंतर दुसऱ्या महायुद्धातच अमेरिकेकडून जपानच्या दोन शहरांमध्ये हिरोशिमा आणि नागासकीमध्ये अणुबॉम्ब हल्ला केला होता.

आईनस्टाईन यांनी लिहिलेल्या पत्रात अमेरिकेच्या राष्ट्रपतींना सतर्क केले होते. त्यांनी म्हटले होते की, जर्मनी अणुबॉम्बचा शस्त्र म्हणून वापर करत आहेत. यावरून त्यांनी अमेरिका सरकारला सतर्कदेखील केले होते. पत्रात म्हटले गेले होते की, युरेनियमचा एक नवीन ऊर्जा स्रोतामध्ये संचार केला जाऊ शकतो, ज्याचा वापर अधिक शक्तिशाली विस्फोटक बनवण्यासाठी केला जाऊ शकतो. सोबत, त्यांनी अमेरिका अणु फ्यूजनवर संशोधन आणि बॉम्ब विकसित करण्याचा सल्ला दिला होता. आईनस्टाईन यांच्या पत्राचा लिलाव क्रिस्टिज कंपनीने केला आहे. या कंपनीचे वरिष्ठ तज्ज्ञ पीटर क्लारनेट यांनी हे इतिहासातील सर्वात प्रभावशाली पत्र असल्याचे म्हटले होते. हे पत्र १९३९ साली उन्हाळ्यात लिहिण्यात आलं होते, २००२ मध्ये मायक्रॉस्फॉटचे को फाऊंडर पॉल एलन यांनी २१ लाख डॉलरमध्ये तेव्हा खरेदी केले होते. यापूर्वी या पत्राचे मालक प्रकाशक मॅल्कम फॉर्ब्स होते. त्यांनी हंगेरीचे शास्त्रज्ञ लियो जिलार्डकडून ते मिळवले होते. आश्चर्य म्हणजे, हे पत्र जिलार्ड याने लिहिले होते. त्यावर आईनस्टाईन यांची स्वाक्षरी होती. दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेने जपानच्या नागासकी आणि हिरोशिमावर अणुबॉम्ब हल्ला केला होता. त्यानंतर आईनस्टाईन यांनी अणुबॉम्बचा शस्त्र म्हणून झालेल्या वापरावर दुखः व्यक्त केले होते. अल्बर्ट आईनस्टाईन यांनी या अणुबॉम्ब हल्ल्याबाबत तीव्र दिलगिरी व्यक्त केली होती. दरम्यान अमेरिकेने करण्यात आलेल्या हल्ल्यात जवळपास २ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतही कित्येक काळ त्याचे परिणाम या शहरांवर पाहायला मिळत आहेत.



## पहिले 'तंबाखूमुक्त गाव'

ईशान्य भारतात अनेक वैशिष्ट्यपूर्ण गावं आहेत. केवळ देशातीलच नव्हे तर आशियातील सर्वात स्वच्छ गाव म्हणजे मेघालयातील मॉलीलोंग. देशातील सर्वात स्वच्छ नदी उम्नगोट ही मेघालयातच आहे. देशातील पहिले तंबाखूमुक्त गावही ईशान्य भारतातच आहे हे तुम्हाला माहिती आहे का? नागालँडमधील गरिफेमा हे गाव देशातील पहिले 'तंबाखूमुक्त गाव' म्हणून २०१४ मध्ये जाहीर करण्यात आले होते.

त्यावेळी जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त नागालँडचे मुख्य सचिव आर बेनचिलो थाँग यांनी गरिफेमा ग्रामपंचायतीच्या सभागृहात ही घोषणा केली होती. गरिफेमा ग्रामपंचायत, व्हिलेज व्हिजन सेल आणि व्हिलेज स्टुडण्टस्? युनियन यांच्या सहकार्याने याबाबतचे तंबाखूमुक्त अभियान चालविण्यात आले होते. त्याअंतर्गत गावात कुणीही मद्य आणि तंबाखूजन्य पदार्थ विकत असेल किंवा कुणी मद्य पिऊन सार्वजनिक शांततेचा भंग करीत असले त्या व्यक्तीला एक हजार रुपये दंड ठोठावण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले होते. त्याचबरोबर मद्य, बिडी, पान, धूरविरहित तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करताना रस्त्यावर वा सार्वजनिक ठिकाणी आढळून आले तर त्या व्यक्तीला ५०० रुपयांचा दंड करण्यात येईल, असेही जाहीर करण्यात आले होते. नागालँडमध्ये ६७.९ टक्के पुरुष तर २८.१ टक्के महिला तंबाखू, तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करतात. दर दिवशी २ हजार २०० भारतीय तंबाखू सेवनाने मरण पावतात आणि देशातील ४० टक्के लोक कर्करोगाचे बळी ठरतात. यापैकी तोंडाचा कर्करोग होणारे ९० टक्के लोक तंबाखू सेवन करणारे असतात. जगभरात तोंडाचा कर्करोग होणाऱ्या रुग्णांमध्ये भारताचा क्रमांक सर्वात वरचा आहे. या पार्श्वभूमीवर गरिफेमामध्ये हे अभियान चालवून गावाला 'तंबाखूमुक्त गाव' करण्यात आले होते.

## जितके भूकंप, तितके जमिनीत सोने

सर्वांत विध्वंसक नैसर्गिक आपत्तींमध्ये भूकंपाचा समावेश होतो. भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी होते. त्यामुळे भूकंप होणे अर्थातच कोणालाही नको असते; मात्र याच भूकंपामुळे सोन्याची निर्मिती होते, हे फार कमी जणांना माहिती असेल. शास्त्रज्ञांनी याबाबत मोठा शोध लावला आहे. भूकंपामुळे क्वार्ट्झ्? (सिलिकॉन डायऑक्साईडपासून तयार झालेलं खनिज) क्वार्ट्झमधून जाणाऱ्या फ्रॅक्चर लाइन्समध्ये सोन्याचे गोळे तयार होतात, असा या शास्त्रज्ञांचा दावा आहे.

क्वार्टझ् हे पृथ्वीच्या कवचात विपुल प्रमाणात आढळणारे खनिज आहे. क्वार्ट्झ हे पायझोइलेक्ट्रिक मटेरियल आहे. म्हणजेच जेव्हा त्यावर यांत्रिक ताण पडतो तेव्हा त्यातून इलेक्ट्रिक चार्ज तयार होऊ शकतो. या गुणवत्तेमुळे हे खनिज घड्याळं आणि इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांच्या निर्मितीमध्ये अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. द्रवरूपातल्या सोन्यातल्या आयन्सचे स्थायूरूपात रूपांतर करण्याकरिता इलेक्ट्रॉन मिळवण्याकरिता वीज कारणीभूत ठरू शकते. ऑस्ट्रेलियातल्या मोनाश युनिर्व्हिसिटीतले जिओलॉजिस्ट (भूगर्भशास्त्रज्ञ) आणि नेचर जिओसायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या नवीन अभ्यासाचे प्रमुख लेखक ख्रिस व्हॉइसी यांच्या मते, क्वार्ट्झमध्ये सतत सोन्याची निर्मिती होते. ते कशा प्रकारे निर्माण होतं, हे कोणालाही माहिती नव्हतं. लहानशा ठिकाणी मोठ्या प्रमाणात सोनं कसं आढळतं, हे जाणून घेण्यासाठी संशोधन करण्यात आले. संशोधकांना असे आढळले की, भूकंपामुळे खडकांचे तुकडे होतात. अशा वेळी हायड्रोथर्मल लिक्विड क्वार्ट्झच्या लाइन्समधून बाहेर येते आणि ती जागा द्रवरूपातील सोन्याने भरली जाते. भूकंपाच्या ताणाला प्रतिसाद म्हणून, क्वार्ट्झ लाइन्स इलेक्ट्रिक चार्ज तयार करतात. त्याची सोन्याशी प्रतिक्रिया होते आणि कालांतराने त्याला स्थायूरूप मिळतं. प्रत्येक भूकंपानंतर अशा प्रकारे जमा झालेल्या सोन्यात वाढ होते.



## सर्वांत उंच महिला

भारतात नागपूरमधील ज्योती आमगे ही महिला जगातील सर्वात कमी उंचीची महिला म्हणून विख्यात आहे. तुर्कीयेमध्ये तब्बल ७ फूट ०.०९ इं उंचीची महिला आहे. या महिलेने सतरा वर्षांची असतानाच सर्वात उंच मुलगी म्हणून गिनिज बुकमध्ये नाव नोंदवले होते. जगातील सर्वात उंच मुलगी असल्याचे खास प्रमाणपत्र तुर्कीतील सफ्रानबोलू या तिच्या मूळ गावी गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्‌ने दिले होते. आता हीच महिला एक वकील, संशोधक आणि वेब डेव्हलपर म्हणूनही कार्यरत आहे.



रुमेश्याचे आई–वडील व भावंडे यांची उंची सर्वसाधारण असूनही तिची उंची मात्र जास्त आहे. रुमेश्या हिला वीव्हर सिंड्रोम आहे. त्यामुळे तिची उंची जास्त आहे. वीव्हर सिंड्रोम हा जनुकीय आजार आहे व त्यामुळे खूप झटपट वाढ होते. तिची उंची तर जास्त आहे पण तिचे हात २४.५ से.मी. लांब आहेत तर पाय ३०.५ से.मी. लांब आहेत. रुमेश्याची ही स्थिती शारीरिक अस्थिरता निर्माण करणारी असून चालताना तिला त्रास होतो. लोकांमध्येही तिची हेटाळणी केली जाते, पण आपल्या उंचीच्या फायद्यांवर आपण लक्ष केंद्रित करतो असे ती म्हणते. इतरापेक्षा वेगळे असल्याचा अनुभव वेगळा असतो, लोकांकडे वरून बघताना वेगळे वाटते. रुमेश्या हिला असे सांगण्यात आले आहे की, आता यापेक्षा तिची वाढ जास्त होणार नाही. जगातील सर्वात उंच माणूस असलेल्या सुलतान कोसेन या तुर्की शेतकऱ्याच्या (२५१ से.मी.) उंचीचा विक्रम ती मोडू शकणार नाही. आतापर्यंत कॅनडाची ॲना हेनिंग स्वान (२४१.३ से. मी. म्हणजे ७ फूट ११ इंच) ही जगातील सर्वात उंच महिला होती पण तिचे १९८८ मध्ये निधन झाले आहे.

## कर्करोगावर नवी उपचारपद्धती

कर्करोगावरील प्रभावी उपचारासाठी सातत्याने संशोधन होत असते. अमेरिकेत मिशिगन विद्यापीठाने त्यासाठी एक वेगळी उपचार पद्धती शोधलेली आहे. कर्करोगावर रुग्णानुसार वेगळे उपचार करण्याची सोय यामध्ये असून या संशोधनात भारतीय वंशाच्या वैज्ञानिकांचा मोठा सहभाग आहे. त्यांनी रुग्णांच्या कर्करोग पेशी प्रयोगशाळेत वाढवण्याचा अभिनव मार्ग शोधला असून त्यामुळे उपचार शोधून काढणे सोपे झाले आहे.

मिशिगन विद्यापीठाने हे तंत्र विकसित केले असून पूवीच्र्या पद्धतींपेक्षा तीन पट प्रभावी आहे. संशोधकांनी म्हटले आहे की, कर्करोगाच्या संशोधनात हे मोठे पाऊल पडले आहे. कर्करोगाच्या पेशी या रुग्णाच्या रक्तातून फिरत असतात. मेटॅस्टॅटिसमुळे शरीरात कर्करोगाची वाढ होऊन नव्वद टक्के रुग्ण मरतात. रक्तात फिरणाऱ्या या कर्करोगपेशी या गाठीतून सटकून रक्तात येत असतात. त्या पेशींमध्ये जनुकीय माहिती बरीच असते व त्यामुळे कर्करोगावर मनोवांच्छित उपचार करणे शक्य



होणार आहे. शिवाय उपचारांचे पर्यायही वाढणार आहेत. प्रत्येक रुग्णासाठी वेगळी उपचार पद्धती तयार करणे त्यामुळे शक्य होईल.

रक्तात फिरणाऱ्या कर्करोग पेशी या रक्ताबरोबर असल्याने त्या मिळवण्याकरिता उतींबरोबर असलेल्या पेशींइतकी बायॉप्सी इतकी कठीण पद्धत वापरावी लागत नाही. फक्त या पेशींच्या माध्यमातून उपचार पद्धती विकसित करणे कठीण असते कारण ज्या रुग्णांचा कर्करोग सुरुवातीच्या टप्प्यात असतो त्यांच्या रक्तात या पेशी फार मोठ्या प्रमाणात सापडत नाहीत. किमान ७३ टक्के रुग्णात अशा पेशी असतात, त्यामुळे यशाचे प्रमाण पूर्वीच्या पद्धतींच्या पेक्षा तीन पट जास्त असते. वैज्ञानिकांच्या मते कर्करोगाच्या सुरुवातीच्या टप्प्यातील रुग्णांमध्ये विश्वासार्ह मार्गाने या कर्करोग गाठीतील पेशी मिळवता येतात.

यामुळे कर्करोग संशोधनाची दिशाच बदलली जाणार असून मिशिगन विद्यापीठाच्या सुनीता नागरथ यांनी त्यात मोलाचे संशोधन केले आहे. त्या रासायनिक अभियांत्रिकीतील सहायक प्राध्यापक आहेत. त्यांनी नवीन तंत्रज्ञान शोधून काढण्यात मोठी भूमिका पार पाडली आहे. पेशींचे पेट्रीडिशमध्ये जे कल्चर तयार केले जाते त्याबाबतची ही पद्धत असून त्यात प्रत्येक व्यक्तीचा कर्करोग अगदी लवकरच्या टप्प्यात निदान केला जाऊ शकतो असे नागरथ यांनी सांगितले. यात कर्करोगपेशी औषधांना कसा प्रतिकार करतात हे दिसते व त्यामुळे औषधांमध्ये सुधारणा करता येईल, असे नागरथ यांचे म्हणणे आहे.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचा राहूल गांधींवर घणाघात

# ३७० परत आणण्याची ताकद नाही!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**उधमपूर :** मोदी सरकारमध्ये दगडफेक किंवा दहशतवादाच्या घटना घडत नाही. राहुल बाबा म्हणतात आम्ही ३७० परत आणू. पण, तुमच्या पुढील तीन पिढ्यांमध्ये ३७० परत आणण्याची ताकद नाही, असा घणाघात अमित शहा यांनी राहूल गांधींवर केला.


जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोचला आहे. भाजप आणि काँग्रेसचे दिग्गज नेते सक्रीयपणे राज्यातील विविध मतदारसंघात प्रचारसभा घेत आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी उधमपूर येथे निवडणूक रॅलीला संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि राहुल गांधींवर जोरदार निशाणा साधला.

ते पुढे म्हणाले की, राहुलबाबा काल म्हणाले की, आम्ही राज्याचा पूर्ण दर्जा देऊ. जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा नक्कीच मिळेल, पण तो नरेंद्र मोदी देतील. ओमर अब्दुल्ला आणि राहुल बाबा म्हणतात की, आम्ही काश्मीरमध्ये लोकशाही आणू. पण, याच कुटुंबांनी जम्मू-काश्मीरला ७० वर्षे याच दोन कुटुंबांनी विभागून ठेवले. यापूर्वी राज्यात शांततेत निवडणुका व्हायच्या का? नरेंद्र मोदींमुळे आज राज्यात शांततेत निवडणुका होत आहेत. काँग्रेस आणि एनसीला जम्मू-काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद आणायचा आहे. हे लोक आपल्या देशाच्या संसदेवर हल्ला करणाऱ्या अफझल गुरूच्या फाशीच्या शिक्षेचा निषेध करतात. ओमर अब्दुल्ला दहशतवाद्यांना बिर्याणी खाऊ घालायचे. अफल गुरुला फाशी देणे गरजेचे होते. जो कोणी दहशत पसरवेल त्याला फाशीनेच उत्तर दिले जाईल. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद परत आणण्याची ताकद कोणामध्ये नाही, असे शहा यावेळी म्हणाले.

### इन्फोग्राफिक्स

## बदलातून पाश्चिमात्य देशांना रशियाचा इशारा

**मॉस्को :** युक्रेनच्या पश्चिमी मित्रदेशांना इशारा म्हणून रशियाच्या आण्विक सिद्धांतात बदल करण्यात आले आहेत, असे रशियाने गुरुवारी स्पष्ट केले आहे. रशियावरील हल्ल्याला कुठलेही सहकार्य त्यांनी देऊ नये, यासाठी हा बदल केल्याचे रशियाने



म्हटले आहे. रशियाचे प्रवक्ते दिमित्री पेसकोव्ह यांनी सांगितले, की आण्विक सिद्धांतामधील बदल हा रशियावर कुणी हल्ला केल्यास संभाव्य धोक्याचा इशारा देण्यासाठी आहे. रशियावर हल्ला केल्यास अथवा हल्ल्यामध्ये सहभागी झाल्यास होणाऱ्या परिणामांची जाणीव व्हावी, यासाठी बदल केले आहेत. हा हल्ला केवळ आण्विकच असेल, असे नाही. कुठल्याही अण्वस्त्रधारी देशाच्या पाठिंब्याने रशियावर झालेला पारंपरिक हल्लाही दोन्ही देशांचा संयुक्त हल्ला समजला जाईल, असे पुतिन यांनी म्हटले आहे. रशियाच्या सार्वभौमत्वाला गंभीर धोका पोहोचल्यास रशिया अण्वस्त्र वापरेल, असा इशारा पुतिन यांनी दिला. रशिया-युक्रेन युद्ध सुरू होऊन तीन वर्षे होत असून, रशिया हळूहळू युद्धामध्ये आपला वरचष्मा दाखवीत आहे. अमेरिकेच्या शस्त्रांच्या सहाय्याने रशियावर हल्ला करू नये, असे अमेरिकेने युक्रेनला बजावले आहे. त्यामुळे युक्रेनची कोंडी झाली आहे. युक्रेनने दीर्घ पल्ल्याची क्षेपणास्त्रे रशियावर डागण्यासंदर्भात अमेरिकेला विचारले होते.

### » Selected

## वंदे भारत ट्रेन ठरतायत पांढरा हत्ती

**नवी दिल्ली :** वंदे भारत ट्रेनमुळे भारतीय रेल्वेचा चेहरा मोहरा बदलण्याचा प्रयत्न मोदी सरकारने केला आहे. एका मागोमाग एक, एकाचवेळी अनेक मार्गांवर वंदे भारत ट्रेन सुरु केल्या जात आहेत. या ट्रेनचे भाडे व्हीआयपी ट्रेनपेक्षाही जास्त आहे. सुरुवातीला काही रुटवर सुरु करण्यात आलेली वंदे भारत ही प्रिमिअम ट्रेन आता जवळपास ६६ मार्गांवर सुरु करण्यात आली आहे. परंतू, या ट्रेनचे भाडेच एवढे आहे की ती सर्वांना परवडणारी नसल्याने काही मार्ग हे तोट्यात चालले आहेत. रेल दुनियाच्या वेबसाईटवर वंदे भारतच्या ट्रेनही माहिती आली होती. यानुसार काही मार्गांवर वंदे भारत एकदम फुल होत आहेत. काही मार्गांवर वंदे भारतला प्रवासीच मिळत नाहीत अशी स्थिती आहे. या ट्रेन पांढरा हत्ती ठरू लागल्या आहेत. भुवनेश्वर-विशाखापट्टणम, टाटानगर-ब्रह्मपूर, उदयपूर-आग्रा/जयपूर, दुर्ग-विशाखापट्टणम आदी मार्गांवर तर निम्म्यापेक्षा जास्त सीट रिकाम्याच राहू लागल्या आहेत.

## माजी मंत्री दाजीसाहेब रोहिदास पाटील यांचे निधन

**मुंबई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व राज्याचे माजी मंत्री, खान्देश भूषण दाजीसाहेब रोहिदास पाटील यांचे काल शुक्रवारी २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता वृद्धापकाळानं दुःखद निधन झालं. त्यांच्या पश्चात पुत्र आमदार कृणाल पाटील, विनय पाटील असा परिवार आहे. दाजीसाहेबांच्या निधनाबद्दल राजकीय वर्तुळातून तीव्र दुःख व्यक्त होत आहे. वयोमानामुळे रोहिदास पाटील यांच्या प्रकृतीत सातत्यानं चढउतार होत होते. काही महिन्यांपूर्वी त्यांना कोल्हापुरातील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले होते. त्यांची फुफ्फुसं कमी क्षमतेनं काम करत असल्याचे निदान झाले होते. उपचारानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता.

### देशाला हादरवणारी घटना! शाळेच्या प्रगतीसाठी शाळा व्यवस्थापकाने

# वडिलांच्या मदतीने दिला दोन विद्यार्थ्यांचा नरबळी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये मानवतेला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. गेल्या रविवारी हाथरस येथील निवासी शाळेच्या प्रगतीसाठी शाळा व्यवस्थापक शिक्षक व त्याच्या तांत्रिक वडिलांनी इयत्ता दुसरीच्या दोन विद्यार्थ्यांचा नरबळी दिला.

ही घटना उघड झाल्यावर गुरुवारी पोलिसांनी या प्रकरणी आरोपी व्यवस्थापक शिक्षक, त्याचे तांत्रिक वडिलांसह पाच जणांना अटक केली. कोतवाली साहपाऊ भागातील रासगनवा गावात चालणाऱ्या डीएल पब्लिक स्कूल या निवासी शाळेतील ११ वर्षीय कृतार्थ कुशवाह रहिवासी तुरसैन याचा गळा दाबून खून करण्यात आला होता.

या प्रकरणी पोलिस निरीक्षक सदाबाद हिमांशू माथूर यांनी सांगितले की, शाळेच्या व्यवस्थापकाचे वडील जशोधन सिंग. दिनेश बघेल हे तांत्रिक विधी करतात.

वडिलांसह शाळेच्या व्यवस्थापकाने शाळेच्या प्रगतीसाठी मुलाचा बळी देण्याचा कट आखला. गेल्या रविवारी रात्री शाळेच्या आतील हॉलमध्ये झोपलेल्या कृतार्थ या विद्यार्थ्यांचा गळा आवळून बळी देण्यात आला. यानंतर व्यवस्थापक आपल्या गाडीतून विद्यार्थ्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावणार होते. कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपींना अटक करण्यात आली आहे. मुलाचा मृतदेह शाळा व्यवस्थापकाच्या गाडीत सापडला.

## पूर्व लडाखमधून सैन्य मागे घेण्यास चीन तयार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गेल्या चार ते पाच वर्षांपासून पूर्व लडाखमधील सीमेवर भारत आणि चीनमध्ये तणावाचं वातावरण आहे. मात्र, दोन्ही देशांमधील हा तणाव कमी करण्यासाठी अनेक दिवसांपासून प्रयत्न सुरु आहेत. आता चीन आणि भारत पूर्व लडाखमधील नियंत्रण रेषेवरील तणाव संपवण्यासाठी आणि संघर्ष कमी करण्याच्या दृष्टीने लडाखमधून सैन्य मागे घेण्यासंदर्भात चीनने सहमती दर्शविल्याची माहिती समोर आली आहे.चीनच्या संरक्षण मंत्रालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे की, चर्चेच्या माध्यमातून चीन आणि भारतामधील मतभेद कमी करण्यास सहमती देण्याबरोबरच एकमेकांशी संवाद मजबूत करण्यास आम्ही सहमती दर्शवू. तसेच दोन्ही देशांना स्वीकारार्ह तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरू ठेवण्याचे सांगण्यात येत आहे.

# आमच्यासाठी तर शेतकरी हिरो- कपिल देव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** संपूर्ण देशाला अन्न पुरविणारा शेतकरी जर अडचणीत असेल तर आपण सर्वांनी त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहीजेत. नवीन तंत्रज्ञान येत आहे, शेतकऱ्यांनीही त्याकडे लक्ष ठेवले पाहीजे. जेणेकरून शेतकरी कुटुंबांना अडचणींचा सामना करावा लागणार नाही", असेही कपिल देव म्हणाले.

शेतकरी आमचा हिरो आहे. जर ते आनंदी नसतील तर आम्हीही आनंदी राहू शकत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येमुळे आम्हालाही दुःख होते. आमच्यासाठी तर शेतकरी हिरो आहे, असेही कपिल देव म्हणाले. हरियाणा विधानसभा निवडणुकीत कोणता पक्ष जिंकेल, असाही प्रश्न कपिल देव यांना विचारण्यात आला. कपिल देव यांचा जन्म हरियाणाची राजधानी चंदीगड येथे झाला आहे.

त्या अनुषंगाने ते काय बोलतात याकडे सर्वांचे लक्ष होते. मात्र कपिल देव यांनी या प्रश्नाचे उत्तर देणे टाळले. ते म्हणाले, मी ज्यादिवशी राजकारणावर बोलायला लागेल, त्यादिवशी शेतकऱ्यांसाठी आणि समाजासाठी काम करू शकणार नाही. तसेच केंद्र सरकारच्या शेतकरी धोरणांवरही बोलण्यास त्यांनी नकार दिला. सरकार त्यांच्यापरिने काम करत आहोत. आपण देशाचे नागरिक म्हणून काय करू शकतो, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असेही कपिल देव म्हणाले.

# एमबीबीएस विद्यार्थ्यांसाठी एक कुटुंब दत्तक घ्यावे लागणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या आणि एमबीबीएसला जाण्यासाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठी बातमी आहे. एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एक कुटुंब दत्तक घ्यावे लागणार आहे. तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागणार आहे.

नॅशन मेडिकल कमिशनने २०२३-२४ च्या सर्व एमबीबीएस विद्यार्थ्यांना फॅमिली एडॉप्शन प्रोग्रॅम लागू केला आहे. ११ जून ते ७ ऑगस्ट या काळात २८ राज्यांमध्ये विविध जिल्ह्यांत हेल्थ कॅम्प आयोजित करण्यात आले होते. यामध्ये देशातील ४९६ मेडिकल कॉलेजच्या ८५ टक्के विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यानंतर एनएमसीने एक अहवाल तयार केला आहे. यामध्ये लोकांना मोठ्या संख्येने बीपी, शुगर, रक्तात लोहाची कमतरता आदी आजार समोर आले आहेत. महत्वाचे म्हणजे या लोकांना याची माहितीच नव्हती. हा अहवाल एनएमसीच्या पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. अरुणा व्ही. वणीकर यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आला आहे. वर्गात शिकवण्यासोबतच विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यास क्रमाच्या पहिल्या वर्षापासून लोकांची आरोग्य तपासणी करण्याची संधी देण्यात आली आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना चांगल्या पद्धतीने समजावून सांगता येईल, असे वणीकर यांनी म्हटले आहे.

एमबीबीएसला प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने पहिल्या वर्षापासूनच कुटुंब दत्तक घेण्यास सुरुवात करावी. कम्युनिटी आउटरीच कार्यक्रमांतर्गत किती कुटुंबांना मदत झाली हे देखील त्या कुटुंबाला भेट देऊन पाहिले जाणार आहे.

**रिपोर्टमध्ये काय...**

- ४० हजार मुलांपैकी ३१% मुले ॲनिमियाग्रस्त असल्याचे समोर आले आहे. तर ३८% महिलांमध्ये ही समस्या असल्याचे दिसले आहे. २.७३ लाख कुटुंबातील १२.०९ लाख लोकांची आरोग्य तपासणी करण्यात आली होती. यापैकी १७ टक्के लोकांना बीपीची समस्या आणि १४ टक्के लोकांना मधुमेहाची समस्या आढळली आहे. शिबिर आणि डोअर टू डोअर जात आरोग्य तपासणी करण्यात आली.

# दिव्यधन रिसायकलिंग इंडस्ट्रीजचा आयपीओ 30 तारखेला बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** दिव्यधन रिसायकलिंग इंडस्ट्रीज लि. पुनर्नवीनीकरण पॉलिस्टर स्टेपल फायबर आणि पुनर्नवीनीकरण पेलेट्सची उत्पादक असलेली कंपनी २६ सप्टेंबर २०२४ रोजी आपला इश्यू खुली केली होती.

प्रत्येकी १० रुपयाच्या दर्शनी मूल्यावर ३७,७६,००० इक्विटी समभागांपर्यंत इश्यूचा आकार आहे. इश्यू साइज २२.६६ कोटी रुपये ते २४.१७ कोटी रुपये आहे. तर प्राइस बँड ६० ते ६४ रुपये प्रति शेअर आहे. लॉट साइज - २००० इक्विटी शेअर्स आहे.

या इश्यूमधून मिळणारे निव्वळ उत्पन्न प्रामुख्याने भांडवली खर्च आणि सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वापरले जाईल. अँकर पोर्शनसाठी बोली २५ सप्टेंबर २०२४ रोजी उघडण्यात आली होती. इश्यू ३० सप्टेंबर २०२४ रोजी बंद होईल. बुक रनिंग लीड मॅनेजर नारनोलिया फायनान्शियल ॲडव्हायझर्स लि. हे आहेत. इश्यूचे रजिस्ट्रार स्कायलाइन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रा. लि. आहेत.

दिव्यधन रिसायकलिंग इंडस्ट्रीज लि.चे व्यवस्थापकीय संचालक श्री. वरुण गुप्ता म्हणाले, " ही सार्वजनिक ऑफर आमच्या उत्पादन क्षमतांचा विस्तार करण्यासाठी आणि शाश्वत उत्पादनातील नवीन संधी स्वीकारण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. जमा केलेला निधी आम्हाला अत्याधुनिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यास मदत करेल. तंत्रज्ञान, आमच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करा आणि पुनर्नवीनीकरण केलेल्या पॉलिस्टर उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी आमचे ऑपरेशन्स स्केल करा.

आम्ही याकडे केवळ कंपनीचा विस्तार करण्याकडे नाही, तर अधिक शाश्वत भविष्यात योगदान देण्याची संधी म्हणून पाहतो. विकासाच्या या नवीन टप्प्याबद्दल आम्ही उत्साहित आहोत आणि पुढे जात असताना आमच्या गुंतवणूकदारांच्या पाठिंब्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत."

नारनोलिया फायनान्शियल ॲडव्हायझर्स लि.चे इन्व्हेस्टमेंट बँकिंगचे संचालक श्री. विपिन अग्रवाल म्हणाले, "दिव्यधन त्याच्या आयपीओजवळ येत असताना, भारतीय पॉलिस्टर फायबर मार्केटमधील कंपनीचा प्रवास शेअर करताना आम्हाला अभिमान वाटतो. रिसायकल पेलेट्सच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित करून आणि ट्रेंडचा स्वीकार करत आहे.

## संसदेच्या स्थायी समित्यांची स्थापना : महताब अर्थ तर थरूर परराष्ट्र व्यवहार प्रमुख

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या स्थायी समित्यांची स्थापना करण्यात आली होती, ज्यामध्ये भाजपचे भर्तृहरी महताब हे अर्थविषयक प्रमुख पॅनेलचे अध्यक्ष होते आणि काँग्रेसचे शशी थरूर हे परराष्ट्र व्यवहारावरील पॅनेलचे प्रमुख होते. विभाग-संबंधित स्थायी समित्या, ज्यांना पक्षीय स्तरावरून प्रतिनिधित्व आहे, त्या मिनी संसद म्हणून काम करतात आणि विविध मंत्रालयांच्या कामकाजावर लक्ष ठेवतात. राज्यसभा सचिवालयाने जारी केलेल्या एका निवेदनाद्वारे समित्यांची अधिसूचना जाहीर करण्यात आली. संरक्षण समितीचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री राधामोहन सिंग असतील, तर गृह मंत्रालयाचे अध्यक्ष भाजप सदस्य राधामोहन दास अग्रवाल असतील.

**राहुल गांधी संरक्षणात**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे संरक्षण समितीचे सदस्य आहेत. संयुक्त पुरोगामी आघाडीच्या (यूपीए) अध्यक्षा सोनिया गांधी यांचे नाव कोणत्याही समितीमध्ये नाही.

टीडीपी आणि जनता दल (युनायटेड) सारखे भाजपचे प्रमुख मित्रपक्ष या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचे महाराष्ट्रातील भागीदार, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस प्रत्येकी एका समितीचे नेतृत्व करणार आहेत. राष्ट्रवादीचे एकमेव लोकसभा सदस्य सुनील तटकरे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू समितीचे नेतृत्व करणार असून शिवसेनेचे श्रीरंग आप्पा बारणे ऊर्जा समितीचे नेतृत्व करणार आहेत. जेडी(यू) चे संजय झा परिवहन, पर्यटन आणि संस्कृती या समितीचे प्रमुख असतील तर टीडीपीचे मागुंता श्रीनिवासुलू रेड्डी गृहनिर्माण आणि नागरी व्यवहार या समितीचे अध्यक्ष असतील. काँग्रेस सदस्य चरणजितसिंग चन्नी आणि सप्तगिरी उलाका यांना कृषी, पशुसंवर्धन आणि अन्न प्रक्रिया समित्यांचे अध्यक्ष करण्यात आले आहे.

## बिहारमध्ये जितिया सणादरम्यान 43 जणांचा बुडून मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** बिहारमध्ये जिवितपुत्रिका उत्सव साजरा केला जात असताना विविध जिल्ह्यांमध्ये घडलेल्या दुर्घटनेत एकूण ४३ जणांचा मृत्यू झाला आहे. या सणादरम्यान स्नान करत असताना या ४३ जणांचा मृत्यू झाला. तर तीन जण अद्याप बेपत्ता आहेत. राज्य सरकारने गुरूवारी ही माहिती दिली. बुधवारी हा उत्सव होता. या उत्सवादरम्यान १५ विविध जिल्ह्यांमध्ये या दुर्घटना घडल्या. जीवितपुत्रिका उत्सवादरम्यान महिला आपल्या मुलांच्या दीर्घायु तसेच निरोगी आरोग्यासाठी निर्जला उपवास करतात. तसेच पवित्र स्नान करतात. बिहार, झारखंड आणि उत्तर प्रदेशातील पूर्वांचल भागात हा सण प्रामुख्याने साजरा केला जातो.

**चार-चार लाख रूपयांचा मदतनिधी**

मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी चार लाख रूपये मदतीची घोषणा केली आहे. सरकारकडून जारी करण्यात आलेल्या विधानात म्हटले की अनुग्रह राशी देण्याची प्रक्रिया सुरू झाला आहे. आठ मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना ही रक्कम आधीच मिळाली आहे.

# आयकर विभागाने मजुराला पाठवली तब्बल २ कोटींची नोटीस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** बिहारच्या गयामध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. आयकर विभागाने एका मजुराला तब्बल २ कोटी ३ हजार ३०८ रुपयांची नोटीस पाठवली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गया येथील नवीन गोडाऊन परिसरात राहणारा राजीव कुमार वर्मा हा मजुरीचं काम करतो.

त्याचं सर्वकाही सुरळीत चाललं होतं पण अचानक आयकर विभागाच्या नोटीसने त्याला मोठा धक्का बसला आहे. राजीव कुमार वर्मा याने सांगितलं की, त्याने २२ जानेवारी २०१५ रोजी गया येथील कॉर्पोरेशन बँकेच्या शाखेत २ लाख रुपये फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवले होते.

पण मुदतपूर्तीपूर्वी त्याने काही कामासाठी १६ ऑगस्ट २०१६ रोजी हे पैसे काढून घेतले. त्यानंतर मजुरीचं काम सुरू केलं. मात्र आता अचानक आयकर विभागाने २ कोटी ३ हजार ३०८ रुपयांची नोटीस पाठवली आहे. २०१५-१६ या वर्षात २ कोटी रुपयांची फिक्स डिपॉझिट करण्यात आली होती, ज्याची रिटर्न फाइल अद्याप भरलेली नाही आणि आयकर विभागाचा करही जमा करण्यात आलेला नाही, असं नोटिसमध्ये सांगण्यात आलं आहे. त्याचवेळी, मजूर राजीव कुमार वर्माचं नावही प्रथमच आयकर रिटर्न फाईलमध्ये आलं. आता महिन्याला १० ते १२ हजार रुपये मजुरी मिळत असेल तर काय कर भरणार असंही मजुराने म्हटलं आहे.

### १३० कोटी रुपयांच्या स्वदेशी बनावटीचे

# तीन परम महासंगणक देशसेवेत रूजू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क




- हवामान, पर्यावरणीय बदलासाठी वापर
- कृषी, आपत्ती निवारणासाठी उपयुक्त
- विज्ञानासह अभियांत्रिकीच्या विज्ञानास बळ

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३० कोटी रुपयांच्या स्वदेशी बनावटीच्या तीन 'परम रुद्र' महासंगणकांचे लोकार्पण केले. हे महासंगणक पुणे, दिल्ली आणि कोलकाता येथे ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय महासंगणकीय प्रणालीअंतर्गत वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीसाठी हे महत्त्वाचे पाऊल आहे. हे तिन्ही महासंगणक स्वदेशी तंत्रज्ञानावर विकसित करण्यात आले आहेत. अनेक वैज्ञानिक विषयांमध्ये अत्याधुनिक संशोधनासाठी या संगणकांचा वापर होणार आहे. दूरदृश्य प्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कार्यक्रमाला संबोधित केले. ते म्हणाले की, 'परम रुद्र' महासंगणक, भारत संगणकीय क्षेत्रात स्वावलंबी होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. संगणकीय क्रांतीत आपल्या देशाचे योगदान बिट, बाईटस्मध्ये नसून टेराबाईटस् आणि पेटाबाईटस्मध्ये असले पाहिजे. त्यामुळे आपण योग्य दिशेने, योग्य गतीने वाटचाल करत आहोत, हे या यशामुळे सिद्ध होते.

यंदाच्या अर्थसंकल्पात संशोधन निधीसाठी 1 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. भारताने वैज्ञानिक शोधात जागतिकस्तरावर आघाडी घेतली पाहिजे. अंतराळ क्षेत्र हे याचे प्रमुख उदाहरण आहे, जिथे भारत एक मोठी शक्ती म्हणून उदयास आला असल्याचे त्यांनी सांगितले. विज्ञान-तंत्रज्ञान, आरोग्य आणि अवकाश संशोधन क्षेत्रासाठी या महासंगणकांचा उपयोग होणार आहे.



## अश्विनच्या नावे ऐतिहासिक कामगिरी

भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला आणि पहिल्या सत्रातच भारताने ३ विकेट मिळवल्या, ज्यात आकाशदीपने २ तर आर अश्विनने एक विकेट घेतली. ही पहिली विकेट घेताच रविचंद्रन अश्विनने एक मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. टीम इंडियाचा स्टार खेळाडू आर अश्विनने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. अश्विनने या सामन्यात बांगलादेशचा कर्णधार नजमुल हुसेन शांतोला बाद करताच तो आशिया खंडात सर्वाधिक विकेट घेणारा भारतीय गोलंदाज ठरला. या विशेष यादीत त्याने भारताचा माजी दिग्गज खेळाडू अनिल कुंबळेला मागे टाकले आहे. या यादीत अनिल कुंबळे ४१९ विकेट्स घेऊन पहिल्या क्रमांकावर होते, मात्र आता अश्विनच्या नावावर आशियामध्ये ४२० विकेट्स आहेत. आशिया खंडात सर्वाधिक विकेट घेणाऱ्या भारतीय खेळाडूंच्या यादीत आर अश्विनने भलेही अव्वल स्थान पटकावले आहे.

### दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस बॅडमिंटन साखळी स्पर्धेत

# कॅप्स रेव्हन्स संघाची विजयी सलामी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना यांच्या वतीने आयोजित दहाव्या पीवायसी-ट्रूस्पेस करंडक बॅडमिंटन साखळी स्पर्धेत साखळी फेरीत सलामीच्या लढतीत कॅप्स रेव्हन्स संघाने ब्लॅक हॉक्स संघाचा ६-१ असा पराभव करून विजयी सलामी दिली.



पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या बॅडमिंटन कोर्टवर आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत सलामीच्या लढतीत गोल्ड खुला दुहेरी १गटात ब्लॅक हॉक्सच्या हर्षद जोगाईकर व तन्मय आगाशे यांनी रेव्हन्सच्या निनाद देशमुख व अनुज मेहता यांचा २१-११, २१-०८ असा पराभव करून खाते उघडले.

गोल्ड खुला दुहेरी २ मध्ये रेव्हन्सच्या केदार नाडगोंडे व तन्मय चोभे यांनी ब्लॅक हॉक्सच्या सिध्दार्थ साठे व राधिका इंगळहळीकर यांचा २१-०९, २१-१८ असा पराभव करून संघाला बरोबरी साधून दिली. त्यानंतर खुला दुहेरी ३मध्ये रेव्हन्सच्या विमल हंसराज व चंद्रशेखर आपटे यांनी गंधार देशपांडे व मधुर इंगळहळीकर यांचा २१-१६, २१-१६ असा तर, महिला दुहेरी ४मध्ये रेव्हन्सच्या

संस्कृती जोशी व प्रांजली नाडगोंडे यांनी ईशा साठे व ईशा घैसास यांचा २१-१९, २१-०५ असा पराभव करून संघाची ३-१ ने आघाडी वाढवली. वाईजमन दुहेरी ५मध्ये रेव्हन्सच्या अजय पटवर्धनने हरीश अय्यरच्या साथीत हॉक्सच्या बाळ कुलकर्णी व संजय शहा यांचा २१-११, २१-०८ असा तर, खुला दुहेरी ६मध्ये रेव्हन्सच्या चिन्मय चिरपुटकर व अजिंक्य मुठे यांनी चिन्मय जोशी व हेमंत करमळकर यांचा १५-११, ०७-१५, १५-०९ असा संघर्षपूर्ण पराभव करून हि आघाडी भक्कम केली. अखेरच्या खुला दुहेरी७मध्ये रेव्हन्सच्या देवेंद्र राठी व विष्णू गोखले यांनी हॉक्सच्या निलेश बजाज व आदित्या जितकर यांचा १५-०४, ११-१५, १५-१० असा पराभव करून संघाला विजय मिळवून दिला.

याआधी स्पर्धेचे उदघाटन पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, मानद सचिव दिपक गाडगीळ आणि ट्रूस्पेसचे मालक उल्हास त्रामिल यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पीवायसी हिंदू जिमखानाचे सहसचिव सारंग लागु, क्लबच्या बॅडमिंटन विभागाचे सचिव तन्मय आगाशे, स्पर्धा संचालक नंदन डोंगरे, अभिषेक ताम्हाणे, नंदन डोंगरे, विवेक सराफ, रणजित पांडे, केदार नाडगोंडे, आमोद प्रधान, समीर जालन आणि दिप्ती सरदेसाई आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोहित, विराट यांनाही 'हे' नाही जमलं, पठ्ठ्याची ब्रॅडमनशी बरोबरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** श्रीलंका विरुद्ध न्यूझीलंड संघात गुरुवारपासून (२६ सप्टेंबर) कसोटी मालिकेतील दुसरा सामना सुरू झाला आहे. या सामन्यात पहिल्या डावात श्रीलंकेच्या कामिंडू मेंडिसने अफलातून फलंदाजी करताना शतकी खेळी केली आहे. त्याने १४७ चेंडूत त्याचे हे कसोटीतील पाचवे शतक पूर्ण केले. याबरोबरच त्याने अनेक विक्रम केले आहेत. मेंडिसचा हा केवळ आठवा सामना आहे. त्याने आठ सामन्यातील १३ व्या डावातच पाचवे कसोटी शतक पूर्ण केले आहे. त्यामुळे तो कारकिर्दीतील पहिल्या ८ कसोटीत ५ शतके करणारा २१ व्या शतकातील पहिलाच फलंदाज ठरला आहे. याआधी हॅरी ब्रुकने त्याच्या पहिल्या ८ कसोटीत ४ शतके केली होती.

तसेच मेंडिसने हे पाचही शतके २०२४ मध्ये केले आहेत. त्यामुळे तो एकाच वर्षात कसोटीत ५ शतके करणारा श्रीलंकेचा अरविंद डी सिल्वा, तिलकरत्ने दिलशान आणि माहेला जयवर्धने यांच्यानंतरचा चौथाच खेळाडू आहे. अरविंद डी सिल्वाने १९९७ मध्ये ७ शतके केली होती, तर दिलशानने २००९ मध्ये ६ शतके केली होती. जयवर्धनेने २००७ मध्ये ५ शतके केली होती.

### ब्रॅडमन यांच्या विक्रमाशी बरोबरी

● मेंडिसने पहिल्या १३ डावात सर्वाधिक शतके करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत सर डॉन ब्रॅडमन यांची बरोबरी केली आहे. ब्रॅडमन यांनीही १३ डावात पाच शतके केली होती. त्यामुळे मेंडिस आणि ब्रॅडमन आता या विक्रमाच्या यादीत संयुक्तरित्या दुसऱ्या क्रमांकावर आहेत. अव्वल क्रमांकावर ऑस्ट्रेलियाचे निल हार्वे असून त्यांनी पहिल्या १३ डावात ६ शतके केली होती. याशिवाय मेंडिस १३ डावात ५ शतके करणारा पहिलाच आशियाई खेळाडू आहे. दरम्यान, त्याने जर या डावात १७८ धावांपेक्षा अधिक धावांची खेळी केली, तर तो कसोटीत १००० धावाही पूर्ण करेल. त्यामुळे तो सर्वात जलद कसोटीत १००० धावा पूर्ण करणारा आशियाई फलंदाज ठरेल.





# राजगुरू महाविद्यालयात जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** जिल्हा क्रीडा परिषद अंतर्गत पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय , खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना व हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ व २६ सप्टेंबर रोजी आंतरशालेय जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग मुले व मुली स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील १७ व १९ वर्षे वयोगटाखालील एकूण ९० मुले व ८१ मुलींनी सहभाग नोंदवला.

स्पर्धेचे उदघाटन खेडचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश मोहारे, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक हिरामण सातकर, अनिल राक्षे, महाराष्ट्र वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष सुधीर म्हाळसकर, नितीन वरकड, लतिफ शेख, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रबंधक के. आर. पाचारणे उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रांताधिकारी अनिल दौंडे म्हणाले, की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड गुणवत्ता असून त्यांनी खेळाच्या माध्यमातून करियर करण्याचा विचार करावा. ऑलिंपिक स्पर्धेपर्यंत आपले ध्येय ठेवून सराव करावा. योग्य मार्गदर्शन आणि समतोल आहार घेऊन प्रचंड मेहनत करावी असे आवाहन केले.

### चौथी ‘स्पार्टन मान्सुन लीग’ अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धा

# पुणे रेंजर्स, कल्याण क्लब यांच्यामध्ये विजेतेपदासाठी लढत !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पार्टन क्रिकेट क्लब तर्फे आयोजित चौथ्या ‘स्पार्टन मान्सुन लीग’ अजिंक्यपद टी-२० क्रिकेट स्पर्धेत पुणे रेंजर्स क्रिकेट क्लब आणि कल्याण क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस् क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उपांत्य फेरीमध्ये शैलेश संत याने फटकावलेल्या ७२ धावांच्या जोरावर पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने विस्ट्रोन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स् संघाचा ७ गडी राखून सहज पराभव केला.





पहिल्यांदा फलंदाजी करताना विस्ट्रोन ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स्ने २० षटकात २१८ धावांची मोठी धावसंख्या उभी केली होती. सिद्धार्थ रोमन याने ८९ धावांची तर, अमोल कमलापुरी याने ६० धावांची खेळी केली. हे आव्हान पुणे रेंजर्स क्लबने १६.५ षटकात व ३ गडी गमावून सहज पूर्ण केले. यासाठी संघाला मदत झाली ती शैलेश संत याने केलेल्या खेळीची !! शैलेश याने ३७ चेंडूत ६ चौकार आणि ५ षटकारांसह नाबाद ७२ धावांची खेळी केली. यासोबतच निखील नासेरी (६१ धावा), श्रीकांत पानसे (२८ धावा), स्वानंद भागवत (२८ धावा) आणि प्रसाद कुंटे (नाबाद २४ धावा) यांनीही धावांचे योगदान देऊन संघाचा विजय साकार केला.

रोहीत गुगळे याने केलेल्या ७९ धावा आणि अचूक गोलंदाजीच्या जोरावर कल्याण संघाने सेरेन स्ट्रायकर्सचा १४० धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना कल्याण क्लबने २० षटकामध्ये २६३ धावांची धावसंख्या उभी केली.

रोहीत गुगळे याने ३२ चेंडूत ३ चौकार आणि ९ षटकारांच्या मदतीने ७९ धावा चोपल्या. यासह चिराग शेरकर याने नाबाद ६६ धावा, महेश शिंदे याने ४१ धावा आणि पृथ्वीराज गायकवाड याने नाबाद ३० धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना सेरेन स्ट्रायकर्सचा डाव १२३ धावांवर संपुष्टात आला.

# गंभीरच्या जागी धोनीचा खास मित्र, केकेआरचा मोठा निर्णय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ च्या हंगामापूर्वी अनेक संघांमध्ये बदल होताना पाहायला मिळत आहे. आयपीएल २०२५ सुरू होण्यासाठी बराच वेळ असला तरी संघांनी तयारी सुरू केली आहे. दरम्यान, बीसीसीआयकडून लवकरच रिटेनशन पॉलिसी जारी करण्यात येणार असल्याची बातमी आहे. परंतु संघांनी त्यांच्या सपोर्ट स्टाफला आणखी मजबूत करण्यासाठी निर्णय घेत आहेत. आता केकेआर आणि सीएसके बद्दल एक मोठी बातमी समोर आली आहे. केकेआरने गौतम गंभीरच्या जागी आपल्या नवीन मार्गदर्शकाची घोषणा केली आहे. सीएसके साठी हा एक धक्का असू शकतो.

आयपीएलचा सध्याचा चॅम्पियन संघ, केकेआर म्हणजेच कोलकाता नाइट रायडर्सने आपल्या नवीन मार्गदर्शकाची घोषणा केली आहे. केकेआरने म्हटले आहे की, वेस्ट इंडिजच्या सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक असलेला ड्वेन ब्राव्हो आता त्यांचा नवा मार्गदर्शक असेल. यापूर्वी ड्वेन ब्राव्हो सीएसकेच्या संघाचा भाग होता, याच संघाकडूनही तो खेळला आहे.

गेल्या काही हंगामांपासून तो गोलंदाजी सल्लागाराची भूमिका बजावत होता. ड्वेन ब्राव्हो हा मुंबई आणि सीएसके या दोन्ही संघांसाठी खेळलेला खेळाडू आहे.

### पीएमडीटीए-मानांकन एसकेटी आरटेंगो करंडक ८ व १० वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेत

# कियान, अन्वी, इशिता, प्रांशूल यांना विजेतेपद



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए-मानांकन एसकेटी आरटेंगो करंडक ८ व १० वर्षाखालील ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२४ स्पर्धेत कियान पेंडुरकर, अन्वी साहू, इशिता पाटील, प्रांशूल पुजारी यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले.

डेक्कन जिमखाना येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत ८ वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित कियान पेंडुरकर याने तिसऱ्या मानांकित सर्वेश मोहितेचा ७-२ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. तर, मुलींच्या गटात दुसऱ्या मानांकित अन्वी साहू हिने अव्वल मानांकित युक्ता कुटेचा टायब्रेकमध्ये ७-६(२) असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

१० वर्षाखालील मुलांच्या गटात अंतिम फेरीत चौथ्या मानांकित प्रांशूल पुजारीने दुसऱ्या मानांकित विराज कुलकर्णीचा ७-२ असा पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली. मुलींच्या गटात अंतिम लढतीत अव्वल मानांकित इशिता पाटीलने दुसऱ्या मानांकित भाव्या सोनकरचा ७-४ असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्याा खेळाडूंना करंडक व प्रशास्तिपत्राक अशी पारितोषिके प्रदान करण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण स्पर्धा संचालक संदीप किर्तने, महेक सय्यद, अपर्णा सिंग पीएमडीटीए सुपरवायझर प्रणव वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले.

# बुद्धिबळ विश्वविजेतेपदाची लढत भारतीयांमध्येच व्हावी



**नवी दिल्ली :** बुद्धिबळ विश्वात पुरुषांमध्ये आपली ताकद आणि क्षमता किती आहे हे बुद्धिबळ ऑलिंपियाडमधून सिद्ध झाले आहे. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुनसारखे खेळाडू भारताचे भविष्य आहेत. त्यामुळे विश्व अजिंक्यपद स्पर्धा दोन भारतीयांमध्येच झाली तर त्याच्यासारखे दुसरे भाग्य नसेल, असे मत महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद यांनी व्यक्त केले. पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या ग्लोबल चेस लीगचा कार्यक्रमासाठी आनंद मुंबईत आले होते. बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये पुरुष आणि महिला विभागात प्रथमच अजिंक्यपद मिळवल्यानंतर भारतीय संघ मायदेशी परतल्यानंतर बुधवारी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि त्यानंतर आज आनंद मुंबईत आले. साहजिकच बुद्धिबळ ऑलिंपियाडमधील यश आणि भारताचे बुद्धिबळातील भवितव्य याबाबत आनंद भरभरून बोलले. येत्या काळात विश्वविजेत्या चीनच्या डीन लिरेन याला भारताचा गुकेश आव्हान देणार आहे. या लढतीकडे आता बुद्धिबळ विश्वाचे लक्ष लागून राहिले आहे. सध्याची भारताची बुद्धिबळ खेळातील ताकद आणि प्रगती पाहता भविष्यात ही लढत दोन भारतीयांमध्येच व्हावी, असे आनंद गर्वाने म्हणाले. गुकेश, प्रज्ञानंद, अर्जुनसारख्या खेळाडूंमुळे बुद्धिबळात भारताची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुढील पाचच काय तर दहा वर्षे तरी भारताचे वर्चस्व राहील, असे आनंद यांनी सांगितले. भारतात बुद्धिबळ खेळाची लोकप्रियता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. अधिकाधिक महिलांनी या खेळात प्रगती करावी, असे मत आनंद यांनी व्यक्त केले. बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये भारतीय पुरुषांनी एकतर्फी वर्चस्व राखले, त्यामुळे विजेतेपद निश्चित वाटत होते. कारण एकादी लढत गमावली असली तरी दुसरा खेळाडू त्याची भरपाई करण्याच्या ताकदीचा होता. महिलांमध्ये एक लढत गमावली, नंतर बरोबरीत समाधान मानावे लागले.

# टेबल टेनिसमध्ये पीसीसीओई आणि डीवायपी यांचा प्रथम क्रमांक

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा विभागीय क्रीडा मंडळ समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या अंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस मुलींच्या स्पर्धेत निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने (पीसीसीओई) आणि मुलांच्या स्पर्धेत आकुर्डी येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने प्रथम क्रमांक पटकावला. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि रिसर्च (पीसीसीओईआर) येथे या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचे उद्घाटन महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांच्या हस्ते झाले. यावेळी वरिष्ठ क्रीडा संचालक डॉ. शोभा शिंदे, सचिव डॉ. उमेश पनेरू, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. मिलिंद थोरात, प्रा. संतोष पाचरणे, प्रा. अमृता शिंदे व इतर महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक आदी उपस्थित होते. मुलींच्या स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेजने आणि तृतीय क्रमांक ताथवडे येथील इंदिरा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल यांनी मिळविला. मुलांच्या स्पर्धेत ताथवडे येथील राजश्री शाहू कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने दुसरा क्रमांक आणि निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंगने यांनी मिळविला. स्पर्धा संयोजनात प्रा. संतोष पाचरणे, डॉ.अनिल कमलापुरे , प्रा. विवेक भोसले, प्रा. ऐश्वर्या पवार, प्रा. जयश्री बागे, प्रा. अक्षय काशीद, प्रा. रवींद्र टक्के, प्रा. साकेत निकाळजे, डॉ. पांडुरंग लोहाटे, डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. साहिल बागवान, डॉ. हरबंस लाल चव्हाण, प्रा. आबाजी माने, प्रा.अतुल गोरे, प्रा. अमोल आहेर व शारीरिक शिक्षण संचालकांनी सहभाग घेतला. विजेत्या संघाचे व संघ व्यवस्थापकांचे पीसीईटी चे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी अभिनंदन केले व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# १० खेळाडूंना प्रत्येकी सात लाख रुपयाचे पारितोषिक जाहीर

**पुणे :** आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या तसेच राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या महाराष्ट्र राज्यातील पदक प्राप्त खेळाडू व त्यांच्या मार्गदर्शकांना रोख पारितोषिक म्हणून मंजूर करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यात खो-खोतील १० आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश आहे. सुवर्णपदक विजेत्या या खेळाडूंना प्रत्येकी सात लाख व प्रशिक्षकांना १ लाख ८७ हजार ५०० रुपयाचे पारितोषिक मिळणार आहेत. पारितोषिक प्राप्त खेळाडू व प्रशिक्षकांचे महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर, सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा यांनी अभिनंदन केले. पारितोषिकप्राप्त खो खो खेळाडू : अरूण अशोक गुणकी (सांगली), अमित वरुण पाटील, अवधुत भरत पाटील. (दोघे कोल्हापूर), सुयश विश्वास गरगटे, अक्षय प्रशांत गणपुले (दोघे पुणे ) अनिकेत भगवान पोटे (मुंबई), अक्षय संदिप भांगरे ( मुंबई उपनगर), अपेक्षा अनिल सुतार (रत्नागिरी), गौरी राजेश शिंदे,निकीता चक्रधर पवार (दोघी धाराशिव)..